28-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A.1
SGB/ AKN/ KTG/ 13:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी.:** शोक प्रस्ताव

**मु.शी.:** भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, भारताचे माजी राष्ट्रपती व श्री.रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव

**सभापती** : दोन महनीय व्यक्ती आपल्यातून निघून गेलेल्या आहेत त्यांच्या निधनाबद्दल माननीय मुख्यमंत्री यांनी शोक प्रस्ताव मांडण्यापूर्वी मी सभागृहाच्या सर्व माननीय सदस्यांना कळकळीची विनंती करतो की, या दोन थोर व्यक्तिमत्वाबद्दल सगळयांनीच बोलण्याचा आग्रह धरु नये. अपवादात्मक परिस्थितीत ज्यांना बोलण्याची संधी दिली जाईल त्यांनी फक्त 5 मिनिटात त्यांचे विचार मांडावेत.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, या सभागृहात यापूर्वी असा निर्णय घेण्यात आला होता की, शोक प्रस्ताव मांडण्यात येईल त्यावेळी फक्त सभागृहाचे नेते आणि विरोधी पक्षनेते बोलतील. गेली दोन वर्षे आम्ही पहात आहोत की, शोक प्रस्तावावर गट नेत्यांनाही विचार मांडण्याची अनुमती देण्यात येते. विस्ताराने चर्चा केली तर शोक प्रस्तावाचे महत्व कमी होते. यापुढे असे होता कामा नये म्हणून माझी विनंती आहे की, शोक प्रस्तावावर विचार मांडण्यास मर्यादा असावी, विषयाचे गांभीर्य राखावे. जर बोलण्याची संधी दिली तर आमच्या गटाच्या वतीने माननीय सदस्य श्री.कपिल पाटील विचार मांडतील. माझ्याऐवजी माझे मित्र माननीय सदस्य श्री.संदीप बाजोरिया यांना विचार मांडण्यासाठी वेळ देण्यात यावा.

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, अत्यंत दु:खद वातावरणात हा शोक प्रस्ताव मी या ठिकाणी मांडतो.

"भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, भारताचे माजी राष्ट्रपती व श्री.रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती, विधानपरिषद व माजी राज्यपाल यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे सोमवार, दिनांक 27 जुलै, 2015 रोजी शिलाँग येथे अकस्मात निधन झाले. डॉ.कलाम यांच्या निधनाने देशाला महासत्ता करण्यासाठी धडपडणारा भारत मातेचा एक सच्चा सुपुत्र, थोर कर्मयोगी

...2...



वैज्ञानिक आणि एका श्रेष्ठ व्यक्तीला आपण मुकलो आहोत. डॉ.कलाम यांचा जन्म 15 ऑक्टोबर, 1935 रोजी तामीळनाडूतील रामेश्वरम येथे झाला. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेतले. तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ महाविद्यालयातून पदवी घेतल्यानंतर मद्रास इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीतून हवाई अभियांत्रिकी विषयात त्यांनी पदवी संपादन केली. त्यानंतर 1958 मध्ये डिफेन्स रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (डीआरडीओ) या संस्थेत ते सहाय्यक शास्त्रज्ञ म्हणून रूजू झाले. त्यानंतर 1963 पासून इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (इस्त्रो) या संस्थेशी ते जोडले गेले. या संस्थेत त्यांनी उपग्रह प्रक्षेपक तयार करण्याची महत्वपूर्ण जबाबदारी त्यांनी सांभाळली. त्यांच्या परिश्रमातून भारताला रोहिणी हा उपग्रह प्रक्षेपित करण्यात यश आले. त्यानंतर देशाला सामरिकदृष्टया संपन्न करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या निर्मितीत त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. त्रिशूल, अग्नी, पृथ्वी या क्षेपणास्त्रांची निर्मिती करुन फार मोठी कामगीरी त्यांनी बजावली. संपूर्णतः स्वदेशी बनावटीचे तंत्रज्ञान विकसित करण्याच्या त्यांच्या महत्वाकांक्षेमुळेच भारत या क्षेत्रात स्वयंपूर्ण होऊ शकला. 1998 मध्ये पोखरण येथे झालेल्या अणु चाचण्या हा त्यांच्या प्रतिभेचा अविष्कार होता.

सभापती महोदय, डॉ.कलाम यांनी संरक्षण मंत्र्यांचे विज्ञान विषयक सल्लागार, 1992 ते 1999 या काळात डीआरडीओचे सचिव, 1999 ते 2001 या काळात देशाचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार तसेच केंद्रीय मंत्रिमंडळाच्या वैज्ञानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केले होते. डॉ.कलाम यांनी 17 जुलै, 2002 ते 23 जुलै, 2007 या कालावधीत देशातील सर्वोच्च असे राष्ट्रपती पद भूषविले होते. त्यांच्या कामगीरीचा गौरव म्हणून जगातील 30 विद्यापीठांनी त्यांना डॉक्टरेट बहाल केली. 1981 मध्ये पद्मविभूषण व 1990 मध्ये पद्मभूषण तर 1997 मध्ये देशाचा सर्वोच्च सन्मान असणाऱ्या भारतरत्न पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले. या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शिवाय त्यांना रामानुजम पुरस्कार विधिवत मिळाला. इंदिरा गांधी एकात्मता पुरस्कार देखील लाभला.

सभापती महोदय, डॉ.कलाम यांनी 21 व्या शतकात आपल्या देशाच्या युवा शक्तीची ताकद ओळखून त्याचा लाभ देशाने घेतला पाहिजे याची प्रथम जाणीव देशाला करुन देण्याचे कार्य केले. या देशामध्ये 21 व्या शतकाच्या सुरुवातीलाच हा देश एका डेमोग्राफीक डिव्हीडण्डकडे जातो आहे, युवा शक्तीची एक मोठी संधी या देशाला प्राप्त होत आहे, या युवा शक्तीला व या डेमोग्राफीक

...3..



श्री.देवेंद्र फडणवीस....

डिव्हीडण्डला मानव संसाधनामध्ये जर परिवर्तीत केले तर 2020 साली भारत हा जगातील एक महासत्ता होऊ शकतो अशा प्रकारचा विश्वास व अशा प्रकारचा मार्ग या देशाला दाखविण्याचे काम माननीय डॉ.कलाम साहेबांनी केले. खरे म्हणजे आज ज्यावेळी देश या स्वप्नाच्या पूर्ततेकडे निघालेला असताना त्यांच्या अनुभवाची आपल्याला अत्याधिक आवश्यकता होती, अशा वेळी ते निघून गेले ही खरोखरच अतिशय दु:खद गोष्ट आहे. 'मिसाईल मॅन' म्हणून नावारुपास आलेले डॉ.कलाम यांनी नव्या पिढीला सातत्याने मार्गदर्शन करण्याचे काम केले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात जवळपास सर्वच वयोगटातील जनमानसावर प्रभाव असणारे आणि त्यांना प्रेरणादायी ठरणारे निर्विवाद व्यक्तिमत्व म्हणून डॉ.कलाम यांचेच नाव घ्यावे लागेल. आपल्या 'अग्निपंख' या ग्रंथात त्यांनी अग्नीच्या निर्मितीच्या कामात स्वत:ला कसे झोकून दिले याचे वर्णन केले आहे. विज्ञानातील हा धगधगता अग्नी आज निमला आहे.

सभापती महोदय, डॉ.कलाम हे केवळ शास्त्रज्ञ नव्हते तर ते श्रेष्ठ व्यक्ती देखील होते. जीवनामध्ये अनेकांना प्रेरणा मिळावी अशा प्रकारचे कार्य त्यांनी सातत्याने केले. ज्यावेळी अग्निपंख या पुस्तकाबद्दल त्यांनी लिखाण केले ते पुस्तक त्यांनी आपल्या मातापित्यांना समर्पित केले. अतिशय सुंदर शब्दात त्यांच्या मनातील नितळता या वाक्यातून आपल्यासमोर येते. ते असे म्हणतात, "माझी आई

समुद्राच्या लाटा, सोनेरी वाळू, यात्रेकरुंचा विश्वास, रामेश्वरमची मशीद रस्ता,
सर्व एकात्म होऊन बनते - माझी आई!
तू माझ्याकडे येतेस, बनून स्वर्गाचे प्रेमळ हात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मला लढण्याचे दिवस आठवतात, जेव्हा आयुष्य होते आव्हान आणि कष्ट
पहाटेपूर्वीच्या काळोखात मैलोगणती चालणे
देवळाजवळ संतवृत्तीच्या गुरूकडे शिकण्यासाठी जाणे
पुन्हा चालणे, दुसऱ्या शाळेत-अरबी शिकायला.
वाळूच्या टेकडया चढत रेल्वे स्टेशन गाठणे,
वर्तमानपत्रांचे गठ्ठे उचलणे, देवळाच्या गावात लोकांना वाटणे,
सूर्योदयानंतर काही वेळाने शाळेत जाणे,
रात्रीच्या अभ्यासापूर्वी थोड्या उद्योगाची सायंकाळ.

...4..



श्री.देवेंद्र फडणवीस....

छोटया मुलाच्या या साऱ्या वेदना,
आई, त्या वेदनांचे तू पवित्र आत्मशक्तीत रूपांतर केलेस.
पाच वेळा गुडघे टेकवून, वाकून
फक्त देवाच्या आशीर्वादासाठी, प्रिय माते,
तुझी बलवान निष्ठा तुझ्या मुलांची शक्ती आहे.
प्रत्येकाची गरज ओळखून तुझ्यातील उत्तम तू दिलेस,
तू नेहमीच देत आलीस, देवावर विश्वासून देत आलीस.
मला आठवतो एक दिवस, मी दहा वर्षाचा असताना,
मी तुझ्या मांडीवर डोके टेकून शांत झोपलो होतो,
मोठी भावंडे हेव्याने पहात होती.
पौर्णिमेची रात्र आणि फक्त तुलाच ठाऊक असलेले माझे विश्व.
आई, माझी प्रिय आई.
मध्यरात्री जाग आली गुडघ्यावर थपथपणाऱ्या तूझ्या अश्रूंनी.
तुझ्या मुलाच्या वेदना तूला जाणवल्या.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर बी.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

तुझ्या सांत्वनाचा स्पर्श हळूहळू त्या वेदना शांतवत होत्या. तुझे प्रेम, तुझी काळजी, तुझा विश्वास, त्यांनी मला शक्ती दिली, जगाला निर्भयतेने तोंड देण्याची. त्याची शक्ती सोबतीला घेऊन, माझी आई कयामतच्या दिवशी आपण पुन्हा भेटू." अशा प्रकारे आपल्या आईचे वर्णन डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम साहेबांनी केले आहे. ज्यावेळी अग्नि मिसाईल तयार करण्यात आले त्यावेळी त्यांनी अग्नि मिसाईलचे वर्णन करताना असे सांगितले की, अग्निकडे केवळ मिसाईल म्हणून बघू नका. ज्या दिवशी अग्नि मिसाईलचे प्रक्षेपण झाले त्या रात्री त्यानी डायरीत काही ओळी लिहून ठेवल्या. त्या ओळी मी वाचून दाखवितो. ते असे म्हणतात, "अग्निकडे असे पाहू नका. एका आकाशाकडे पाहात असलेली वस्तू अनिष्ठाला दूर पळण्यासाठी व तुमच्या सामर्थ्यचे प्रदर्शन ती आग आहे, भारतीयांच्या हृदयातली. तिला क्षेपणास्त्राचे स्प्न नकाच देऊ. तिच्या समवेत आहे, राष्ट्राची जळती अस्मिता म्हणूनच ती इतकी प्रकाशमान आहे." अशा प्रकारे डॉ.कलाम साहेबांनी अग्नि मिसाईलचे वर्णन केले आहे.

शेवटी ते आपल्या जीवनाबद्दल असे म्हणतात की, मी आहे एक थोर भूमितील एक विहीर. तिच्या लाखो करोडो मुला-मुलींकडे पाहतो आहे. त्यांनी माझ्यातून काही तरी घ्यावे. कधीही न संपणारे देवत्व आणि सर्वदूर पसरावी त्याची कृपा, जसे विहिरीतून काढलेले पाणी. त्यांनी सांगितले की, माझे जीवन खूप काही आदर्श आहे असे मला वाटत नाही. पण तरी देखील माझ्या जीवनामध्ये मी जे कमवू शकलो,मिळवू शकलो ते इतरांना देखील मिळाले पाहिजे हीच माझी धडपड आहे.

सभापती महादय, आपल्याला माहीत आहे की, भारताला एक महासत्ता बनविण्याचे स्वप्न त्यांनी बघितले होते. सन 2020 साली भारत महासत्ता होऊ शकतो याकरिता त्यांनी स्वप्न पाहिले. भारताचा शेतकरी समृद्ध झाला पाहिजे असे देखील त्यांना वाटते. त्यासंबंधी ते असे म्हणतात की, भारताची आर्थिक वृद्धी बऱ्याचशा प्रमाणात शेतीवर अवलंबून आहे. शेती, अन्नधान्य प्रक्रिया उद्योग, त्याची आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घातली गेली तर या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण होऊन देशाच्या संपत्तीत भर पडेल. असे म्हटलेले आहे की, वापर करणारे, प्रक्रिया करणारे आणि प्रक्रियेचे ज्ञान व कसब अंगी बाळगणारे असे तिघे एकत्र आले तर ते फक्त



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

यशस्वी होऊन थांबत नाही तर ते यशोमंदिराचा कळस गाठतात. या सर्वांची सांगड घालून जे बलशाली जाळे तयार होईल त्यातून फक्त वृद्धी आणि विकास होऊन थांबणार नाही तर ती वृद्धी सर्व दिशांनी नजरेला येईल. ते पुढे असे म्हणतात की, दुसरी हरितक्रांती प्रत्यक्षात आणणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रशिक्षण आणि त्याला तंत्रज्ञानाची जोड दिली तर इ.स.2020 पर्यंत 36 कोटी टन इतके महाप्रचंड धान्य उत्पादन करता येईल. धान्य साठवणुकीची नवीन विकसित तंत्रे, धान्याचे परिणामकारक पद्धतीने वाटप, धान्याच्या होणाऱ्या नासाडीचे नियंत्रण या त्रिवेणी संगमातून देशातील प्रत्येकाला अन्न मिळेल आणि गरिबी संपून जाईल. तरुण मंडळी हे आव्हान स्वीकारतील, अशी आम्हाला खात्री आहे. ज्ञानाधिष्ठीत समाजातील उत्पादन विभागाचा आपण सातत्याने मागोवा घेतला पाहिजे.

सभापती महोदय, दारिद्र्य निर्मूलनाच्या संदर्भात त्यांनी जे विचार मांडले ते ही या देशाला अतिशय पथदर्शी अशा प्रकारचे आहेत. ते असे म्हणातत की, मग आपणच दारिद्र्य, निरक्षरता, या आपल्या घरच्या शत्रु विरुद्ध प्रयत्न एकवटून नीटपणे आपल्या लक्ष्यावर केंद्रीत केले तर आपल्या या प्रबळ आणि सामुदायिक इच्छाशक्ती पुढे कुठलाही अडथळा टिकाव धरू शकणार नाही. मग त्याच वेळी तंत्रज्ञानाचा उपयोग करून देशातील दारिद्र्य कसे घालवता येईल यासंदर्भातील विचार "माझ्या स्वप्नातील भारत" यामध्ये मांडले आहेत. ते खरोखर भारताकरिता अतिशय पथदर्शी आहे. ते असे म्हणतात की, "आज सारे जग ज्ञानाधिष्ठित समाजामध्ये रूपांतरित होऊ लागले आहे. भारताकडे देखील ज्ञानार्जनातून अर्थार्जन करण्याची अंगभूत क्षमता आहे. कारण माहिती तंत्रज्ञानासारख्या क्षेत्रात हा भारत खूप वरच्या पातळीवर आहे. त्या शिवाय भारताकडे विपुल नैसर्गिक स्रोत आहेत आणि देशात 30 कोटी प्रज्वलित मने आहेत. या सगळ्या स्रोतांचा समाजपरिवर्तनासाठी आणि आर्थिक वृद्धीसाठी योग्य तऱ्हेने वापर व्हावयास हवा. ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

काही अवघड आणि क्लिष्टपणाने विकसित करताना ज्ञानाची ताकद काय असते हे आपण चक्षुर्वैसत्यम् पाहिले आहे, अनुभवले आहे. ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेची म्हणजे नॉलेज इकॉनॉमीची संकल्पना आपण सर्वांनी राबवून 2020 पर्यंत भारताला विकसित करायचे आहे. या संकल्पनेचा भविष्यवेध एक जीवन ध्येय या नात्याने घेऊन ती आपल्याला यशस्वी करायची आहे." म्हणून ते असे म्हणतात की, " विशिष्ट ध्येय समोर ठेवून तुम्ही जेव्हा शिक्षण घेता तेव्हा तुमची सृजनशीलता फुलत जाते. तेव्हा तुमची सृजनशीलता फुलन येते तेव्हा विचार उगम पावतात. जेव्हा विचारांचा उगम होतो तेव्हा ज्ञानज्योत प्रकाशते. जेव्हा ज्ञानज्येत प्रज्वलित होते तेव्हा आर्थिक वृद्धी ही वेग घेत असते.

सभापती महोदय, राष्ट्र उभारणीकरिता काय आवश्यक आहे, हे विचार देखील त्यांनी मांडले ते ही आपल्याकरिता पथदर्शी आहे. ते असे म्हणतात की, "जीवित कार्य साध्य करावयाचे असेल तर शैक्षणिक संस्थांमध्ये आपल्याला खालील क्षमता निर्माण करण्याची गरज आहे. संशोधन आणि सतत चौकस राहण्याची क्षमता, नवनिर्मिती आणि सृजनशीलता यांची क्षमता, उच्च तंत्रज्ञान समजून घेऊन त्याचा अचूक वापर करण्याची क्षमता, उद्योजगकीय नेतृत्त्व घडविण्याची क्षमता, आणि नीतिमान नेतृत्त्वाची क्षमता". 21 व्या शतकात भारताना खऱ्या अर्थाने महासत्ता बनविण्याचा राजमार्ग डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम साहेबांनी आपल्या समोर ठेवला आहे. त्यामार्गाने जाऊन भारतातील युवा शक्तीचा उपयोग करून भारताला जागतिक महासत्ता बनविण्याचे कार्य आपण केले तर तीच खऱ्या अर्थाने त्यांच्याकरिता श्रद्धांजली ठरेल. म्हणून केवळ वैज्ञानिक महणून नाव लौकिक कमाविला नाही, तर राष्ट्रपती पदी असताना आपल्या साध्या राहणीमानाने त्यांनी नवीन उंची या पदाला मिळवून दिली होती. आपल्या ज्ञानाचा अधिकाधिक उपयोग व्हावा आणि ते सामान्यांपर्यंत पोहोचावे यासाठी त्यांची तळमळ असायची. त्यामुळे देश आज मोठ्या राष्ट्रभक्ताला, मार्गदर्शकाला मुकला आहे. या थोर नेत्याचे सोमवार, दिनांक 27 जुलै 2015 रोजी दु:खद निधन झाले. अशा या ज्येष्ठ नेत्याला सभागृहाच्यावतीने आणि वैयक्तिकरित्या मी माझ्याकडून श्रद्धांजली अर्पण करतो.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

सभापती महोदय, आज एक दुसरा शोक प्रस्ताव अत्यंत दु:खद अंत:करणाने मी मांडतो आहे. रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते आदरणीय श्री.रामकृष्ण सूर्यभान उपाख्य दादासाहेब गवई यांचे शनिवार, दिनांक 25 जून 20105 रोजी नागपूर येथे निधन झाले.

श्री.रा.सू.गवई साहेब यांच्या निधनानिमित्त मी तीव्र शोक व्यक्त करीत आहे. त्यांच्या निधनाने राज्यातील समतावादी चळवळीतील एक ज्येष्ठ नेत्तृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. श्री.रा.सु.गवई साहेब यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील दारापूर येथे दिनांक 30 ऑक्टोबर 1929 रोजी झाला. त्यांनी नागपूर विद्यापीठातून बी.ए.ची पदवी घेतली होती. विधान परिषदेचे सदस्य म्हणून 1964 मध्ये त्यांची प्रथम निवड झाली. त्यानंतर ते सलग 1994 पर्यंत विधान परिषदेचे सदस्य होते. 1968 ते 1978 या कालावधीत त्यांनी उप सभापती, 1978 ते 1984 या कालावधीत सभापती, तर 1986 ते 1988 या काळात विरोधी पक्ष नेते पदही भूषविले होते. 1988 मध्ये ते अमरावती मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले. 2000 ते 2006 या काळात त्यांनी राज्य सभेत प्रतिनिधीत्व केले. त्यानंतर सन 2006 ते 2008 या कालावधीत बिहार, सन 2008 ते 25 ऑगस्ट 2011 या काळात ते केरळ राज्याच्या राज्यपाल पदी कार्यरत होते. दिनांक 13 जुलै 2006 ते 12 ऑगस्ट 2006 या काळात त्यांनी सिक्कीमचे हंगामी राज्यपाल म्हणूनही काम बघितले. वंचित वर्गात शिक्षणाच्या प्रसारासाठी अमरावती येथे श्री.दादासाहेबांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. त्यांनी दलित, मागासवर्गीय, कल्याणासाठी अतिशय विशेष आणि उल्लेखनीय कार्य केले. तसेच, पाली भाषा प्रचार समिती राष्ट्रकुल संसदीय परिषद आदी उपक्रमांच्या माध्यमातून ते सातत्याने कार्यरत राहिले. विद्यार्थी जीवनापासून ते रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून राजकीय जीवनात सातत्याने सक्रिय होते. रिपब्लिकन पक्षाचे विदर्भ विभागाचे सचिव, या पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारिणीचे सदस्य तसेच राष्ट्रीय अध्यक्ष पदही त्यांनी भूषविले होते. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून प्रेरणा घेऊन त्यांनी तळागातील जनतेच्या विकासाकरिता आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. ज्यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूरच्या ऐतिहासिक भूमीवर ....

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस .....

धम्म चक्र प्रवर्तनाचा निर्णय घेतला त्यावेळी या संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी आदरणीय डॉ.बाबासाहेबानी दादासाहेब गवई यांना दिली होती. त्यांनी अतिशय मेहनतीने फार मोठी टीम उभी करुन हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. हा सर्व कार्यक्रम करण्यामध्ये अतिशय मोलाचे योगदान दादासाहेब गवई यांनी दिले होते.

सभापती महोदय, आज आपण जी दीक्षा भूमी बघतो ती शून्यातून येथपर्यंत उभी करण्यामध्ये दादासाहेबांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. आज कोटयावधी जनता दीक्षा भूमीला भेट देण्यासाठी येत असते व ही दीक्षा भूमी कोटयवधी जनतेला प्रेरणा देत असते. प्रेरणा देणाऱ्या वास्तूची निर्मिती दादासाहेबांनी स्वतः लक्ष घालून केली होती. केवळ प्रेरणा देणारी भूमी येथपर्यंतच नाही तर एक प्रकारचे आर्किटेक मार्बल त्यांनी तयार करुन दाखवले.

सभापती महोदय, आज त्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज कार्यरत असून नागपूरमधील पहिल्या दोन तीन कॉलेजमध्ये या कॉलेजची गणना होत असते. कारण दादासाहेबांचा भर हा नेहमी गुणवत्तेवर असायचा. जे लोक गुणवत्ता आणू शकतील अशा लोकांनाच त्यांनी काम दिले होते. या कॉलेजमध्ये जे वेगवेगळे कोर्सेस चालवले जातात त्यामुळे तेथील प्रवेशाकरिता विद्यार्थी खूप मोठ्या रांगा लावत असतात, किंबहुना नागपूर आणि विदर्भातील सर्व मेरीटच्या विद्यार्थ्यांना याच कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा असे वाटते इतके मोठे कार्य दादासाहेबांनी उभे केले आहे. शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणा घडविण्यासोबत त्यांनी दलित समाजाच्या उध्दाराकरिता विशेष कार्य केले होते. मेलेली जनावरे माणसाने वाहून नेण्याची कुप्रथा बंद करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता. 1964 मध्ये प्रादेशिक सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे त्यांना कारावास भोगावा लागला होता. त्यांनी "Five Year Plan in relation to the Scheduled Caste & Scheduled Tribes", "Scheduled Caste & Scheduled Tribes and their Services, Privileges", बुध्दांच्या सवलती आणि संपूर्ण कैफियत इत्यादी पुस्तकांचे लिखाण त्यांनी केले. दादासाहेब हे एक अस्सल क्रीडा प्रेमी होते. वेस्टर्न फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्षपद सुध्दा त्यांनी भूषवले होते, या शिवाय ते साहित्य प्रेमीही होते. अमरावती येथे 1989 मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्षही होते.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस .....

सभापती महोदय, वैयक्तिकदृष्टया माझा दादासाहेबांशी खूप जवळचा संबंध आला होता. माझे वडील कै.गंगाधरराव फडणवीस यांचे आणि दादासाहेबांचे खूप जवळचे संबंध होते. माझ्या वडीलांच्या मृत्यूनंतर ते सातत्याने, आस्थेने माझी विचारपूस करीत असत. किंबहुना मी कधीही भेटलो तरी परिवारामध्ये काय चालले आहे, सगळे ठीक आहे की, नाही ? याची विचारपूस दादासाहेब सातत्याने करीत असे. मी नगरसेवक झालो, महापौर झालो किंवा आमदार झालो या प्रत्येक वेळी त्यांचा स्वत:हून फोन यायचा आणि ते सांगत असे की, मला तुझी प्रगती पाहून अत्यंत आनंद होतो. मला वाटते की, हा जीव्हाळा त्यांनी सातत्याने जपला. मी देखील आवर्जून त्यांची भेट घेण्याचा प्रयत्न करीत असे. दादासाहेबाना भेटल्यानंतर माणसाला प्रसन्न वाटेल असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. पक्षाच्या विचाराच्या भिंतीपलिकडे जो व्यक्ती काम करु शकतो तोच खऱ्या अर्थाने नेतृत्त्व करु शकतो. आणि तशा प्रकारचे नेतृत्त्व दादासाहेबांचे होते. आजच्या राजकीय व्यवस्थेमध्ये कुठल्याही प्रक्षाच्या नेत्याशी थेट संवाद करु शकतील किंबहुना एखादी महत्वाची गोष्ट समजून सांगू शकतील आणि ती त्याला ऐकावी लागेल एवढे श्रेष्ठत्व दादासाहेबांनी प्राप्त केले होते. दादासाहेबांचे खूप मोठया प्रमाणात सगळयांशी संबंध होते त्यांचे संबंध राजकीयदृष्टया नाही तर त्याच्या पलीकडे जाऊन कौटुंबिक संबंध होते. मी दादासाहेबांना दोन वेळा भेटावयास गेलो होतो. पहिल्यांदा ज्यावेळी मी त्यांना भेटावयास गेलो त्यावेळी त्यांच्याशी माझी चर्चा झाली होती. त्यावेळेस त्यांची तब्येत खूप चांगली होती असे नाही तर ते अंथरुणावरच होते. परंतु तरी देखील समाजामध्ये काय घडले पाहिजे, आपण काय वेगळे केले पाहिजे याचेच मार्गदर्शन त्यांनी केले होते. मी दादासाहेबांना जेव्हा दुसऱ्यांदा भेटावयास गेलो त्यावेळेस ते सपोर्ट सिस्टीमवर असल्यामुळे त्यांच्याशी माझे बोलणे होऊ शकले नाही. परंतु त्यावेळेस त्यांच्या चेहऱ्यावरचे कृतार्थ भाव मला पहावयास मिळाले होते. एका जीवनामध्ये अनेकांच्या जीवनात हास्य फुलवणारा एक व्यक्ती कशा प्रकारचे कृतार्थभाव आपल्या चेहऱ्यावर ठेवू शकतो हे त्यांच्या चेहऱ्याकडे पाहून मी त्यावेळेस अनुभवले होते. दादासाहेब माझ्याही करिता पितृतुल्य होते. ते निघून गेल्यामुळे माझी वैयक्तिक खूप मोठी हानी झाली आहे. दादासाहेबांनी समाजाच्या उत्थानाकरिता केलेले कार्य

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस .....

अतिशय उल्लेखनीय आहे. संसदीय प्रथा आणि परंपरेचे निष्ठेने पालन करण्याबाबत ते नेहमीच आग्रही होते. राजकारणात सक्रीय असताना राजकारणाच्या पलीकडे विचार करण्याचा उदारमतवाद त्यांनी जोपासल्यामुळेच त्यांना राजकीय वर्तुळात अजातशत्रू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जात होते. आंबेडकरी चळवळीची धुरा सांभाळताना संघर्षासोबत समन्वयवादी भूमिकेतून त्यांनी नेहमीच सामाजिक सलोखा जपला. अशा या ज्येष्ठ नेत्याचे शनिवार दिनांक 25 जुलै, 2015 रोजी निधन झाले. या ज्येष्ठ नेत्याला सभागृहाच्या वतीने तसेच वैयक्तीकरित्या माझ्याकडून मी श्रध्दांजली अर्पण करतो.

----------------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) :सभापती महोदय, आपल्या राष्ट्राचे माजी राष्ट्रपती आदरणीय एपीजे अब्दुल कलाम यांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा प्रस्ताव राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी मांडला आहे. ज्यांच्या निधनामुळे आज प्रत्येक भारतीयाच्या मनात दु:खाचे आणि घरात सुतकाचे वातावरण आहे. ते भारतमातेचे सुपुत्र, माजी राष्ट्रपती, थोर अणुशास्त्रज्ञ, देशाच्या मिसाईल कार्यक्रमाचे जनक कोट्यवधी युवकांचे प्रेरणा स्थान, भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम साहेबांना मी सर्वप्रथम भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, या देशात आपण रामाची, कृष्णाची पुजा करतो. छत्रपती शिवाजी महाराजांसारखे आपण राज्यत्व पाहिले आहे. परमपुजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखे महापुरुष पाहिले आहेत, महात्मा फुलेंसारखे महापुरुष आपण पाहिले आहेत. या महान विभुतींनी या देशात जन्म घेतला, त्यांच्या विषयी आपण फक्त ऐकले, वाचले आहे. परंतु आपण त्यांना पाहू शकलो नाही. परंतु या सर्वांच्या सद्‌गुणांचा अंश ज्यांच्या ठायी एकवटला होता त्या डॉ.एपीजे अब्दुल कलाम साहेबांना पाहण्याचा अनुभवण्याचा प्रसंग या पिढीला मिळाला तो आपल्या सर्वांसाठी भाग्याचा आहे.

सभापती महोदय, माणूस हा दोषांचा पुतळा असतो, अशी आपल्याकडे एक म्हण आहे. परंतु कलाम साहेबांच्या बाबतीत ती अगदी खोटी ठरते. अगदी मायक्रोस्कोपने तपासले तरी, कलाम साहेबांच्या व्यक्तिमत्वात आपल्याला एकही दोष आढळणार नाही. आदर्श जीवन कसे जगावे आणि आदर्श जीवन जगूनही यशस्वी होता येते, ही महत्वाची शिकवण डॉ. कलाम साहेबांनी आपल्याला दिली आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, कलाम साहेबांच्या व्यक्तिमत्वाबद्दल खूप काही सांगता येईल. त्यांच व्यक्तिमत्व बहुआयामी होते. त्यांना ज्ञान,विज्ञान आणि तंत्रज्ञानाची आवड होती, त्यावर त्यांचे प्रभुत्व होते, या गोष्टीमुळे माणसाच जगण सुसह्य करता येईल, असा त्यांचा विश्वास होता. तरीही त्याबाबत ते पूर्ण समाधानी नव्हते.

सभापती महोदय, ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाने माणसाचे जगणे सुसह्य झाले तरी त्याला खऱ्या अर्थाने सुखी करायचे असेल तर संस्काराची गरज आहे, असे त्यांचे सदैव म्हणणे होते.

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे .......

भारतीय परंपरा आणि संस्कृतीचा त्यांना सार्थ अभिमान होता आणि तो जपण्याचा त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला.

नवनवीन साहित्य वाचणे, वेगवेगळया क्षेत्रातल्या लोकांना भेटणे, त्यांच्याकडून शिकत राहणे आणि शिकलेल्या गोष्टी लोकांना, विशेष करुन मुलांना, युवा पिढीला सांगणे हा त्यांचा छंद नव्हे, तर जीवनाचे ध्येय होते. जे ज्ञान आपल्याकडे आहे ते लोकांना देत रहावे ही त्यांची वृत्ती होती. ते नहमी शिक्षकांच्याच भूमिकेत वावरले आणि काल विद्यार्थ्यांना शिकवत असतांनाच त्यांचा मृत्यू झाला. एखाद्या व्यक्तीने ठरवले की, माझा मृत्यू एखादी गोष्ट करताना व्हावा परंतु ते भाग्य त्याला कधी मिळत नाही.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

आपण मिळविलेले ज्ञान पुढील पिढीला दिले पहिजे आणि हे ज्ञान देत असताना त्यांना मृत्यू यावा हा एक योगोयोग म्हणावा की दैवी योग म्हणावा असा मला प्रश्न पडला आहे.

सभापती महोदय, सतत कार्यमग्न राहणे हा डॉ. कलाम यांचा आणखी एक गुण होता. शैक्षणिक, वैज्ञानिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रात त्यांनी मोठे योगदान दिलेले आहे. त्यांच्या निधनाने हानी झाली नाही असे एकही क्षेत्र नाही. सर्वाधिक "लोकप्रिय राष्ट्रपती" असा त्यांचा गौरव होत असला तरी ते आज सर्वाधिक लोकप्रिय भारतीय ठरले आहेत, असे मला आज म्हणावे लागत आहे.

सभापती महोदय, डॉ.कलाम यांनी अणु कार्यक्रमात मोठे योगदान दिले. देशाच्या मिसाईल कार्यक्रमाचे ते जनक होते. परंतु त्याचे मोठेपण फक्त संशोधन कार्यापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी देशवासियांच्या मानसिकतेमध्ये सकारात्मक बदल घडविण्याचे काम केले. देशवासियांना विश्वास दिला. देशातील ज्ञानवंत, गुणवंत युवकांच्या शक्तीच्या बळावर आपला देशही महाशक्ती बनू शकतो, हा विश्वास त्यांनी दिला आणि त्यादिशने वाटचाल करुन दिली. डॉ.कलाम यांना श्रद्धांजली वाहत असताना त्यांना घडविणाऱ्या त्यांच्या आईवडिलांबद्दल तसेच त्यांच्या उच्च शिक्षणासाठी स्वतःचे मंगळसूत्र विकणाऱ्या बहिणीच्या त्यागाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

सभापती महोदय, माझ्या जीवनात मी कधी डॉ.कलाम यांना भेटलो नाही. मी त्यांच्या एका कार्यक्रमाला श्रोता म्हणून गेलो होतो. पण मी एका गोष्टीचा साक्षीदार आहे आणि तो एक योगायोग होता. स्व.प्रमोद महाजन केंद्रीय मंत्री असताना सात सफदरजंग या निवासस्थानी मी गेलो होतो. त्याच दिवशी डॉ.अब्दुल कलाम साहेबांना राष्ट्रपती पदाचे उमेदवार करण्या संदर्भात एनडीएच्या सर्व घटक पक्षाची बैठक होती. मी त्या बैठकीला नव्हतो. पण मी बाहेरुन त्या सर्व हालचाली पाहत होतो. एनडीए पक्षातील सर्व घटक पक्षांच्या नेत्यांचे डॉ.कलाम यांच्या निवडीबाबत एकमत झाले. राष्ट्रपती पदासाठी डॉ.अब्दुल कलाम यांचे नाव निश्चित झाले याची माहिती देण्यासाठी स्व.प्रमोद महाजन हे मा.श्री.अटलबिहारी वाजपेयी आणि मा.श्री.लालकृष्ण अडवाणी यांच्याकडे गेले. मी त्यावेळी योगायोगाने तेथे उपस्थित होतो.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय, डॉ.अब्दुल कलाम यांचा जन्म तामिळनाडू राज्यात झाला. वर्तमानपत्र घराघरात पोहोचवून या देशाचे राष्ट्रपती होता येते, हे जगासमोर डॉ.अब्दुल कलाम साहेबांनी उदाहरण ठेवले आहे. त्यांचे विचार, त्यांचे कार्य, त्यांचे काम या देशाच्या आणि जगाच्या तरुण पिढीला सदैव प्रेरणा देणारे आहे. मी सभागृहाचा विरोधी पक्ष नेता या नात्याने, सभागृहातील सर्व विरोधी पक्षाच्या वतीने आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांना मनापासून श्रद्धांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, या सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री यांनी रामकृष्ण सूर्यभान गवई यांचाही शोक प्रस्ताव मांडला. रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते, बिहार व केरळ राज्याचे माजी राज्यपाल, दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष तसेच या सभागृहाचे सभापती, उप सभापती आणि विरोधी पक्ष नेते अशा अनेक महत्वाच्या पदांची जबाबदारी ज्यांनी अत्यंत प्रभावीपणे, यशस्वीपणे सांभाळली, ते राज्याचे ज्येष्ठ नेते सन्माननीय श्री.रा.सू.म्हणजे रामकृष्ण सूर्यभान गवई यांच्या निधनाबद्दल मी त्यांना भावपूर्ण आदरांजली अपर्ण करतो.

सभापती महोदय, राज्याच्या गेल्या 50 वर्षाच्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीत ज्यांचे महत्वाचे योगदान होते त्या मोजक्या नेत्यांमध्ये रा.सू.गवई साहेबांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीला नवी दिशा आणि गती देण्याचे काम त्यांनी केले. समाजात आजपर्यंत वंचित, उपेक्षित असलेल्या घटकांना, मागासवर्गीय बांधवांना मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर त्यांना चांगले शिक्षण, रोजगार-व्यवसायाच्या संधी मिळाल्या पाहिजेत, त्यांचा शैक्षणिक, सामाजिक आणि महत्वाचे म्हणजे आर्थिक विकास झाला पाहिजे, हा ध्यास घेऊन गवई साहेबांनी सातत्याने प्रयत्न केले.

सभापती महोदय, अगदी विद्यार्थी देशपासूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर त्यांची गाढ श्रद्धा होती. ती त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत जपली. त्यांचे संपूर्ण जीवन, राजकारण, समाजकारण हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारलेले होते. ते खऱ्या अर्थाने बाबासाहेबांचे अनुयायी होते. रिपब्लिकन चळवळीतले नेते अशी त्यांची ओळख असली तरी ती ओळख अपूर्ण आहे. राज्याच्या पुरोगामी चळवळीचे अग्रणी नेते हीच त्यांची खरी ओळख आहे, असे मला वाटते.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय, या देशाला डॉ.बाबासाहेबांनी दिलेली राज्य घटना आणि संसदीय लोकशाही परंपरा अधिक बळकट आणि समृद्ध करण्याचे काम सन्माननीय गवई साहेबांनी जीवनात केले. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी प्रदीर्घ काम केले. या कालावधीत त्यांनी सभागृहाच्या उच्च नैतिक मूल्यांची जपणूक केली. सभागृहाचा सन्मान एका उंचीवर नेऊन ठेवला.

सभापती महोदय, दिनांक 26 जुलै, 1994 रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेतून निवृत्त होईपर्यंत सलग 30 वर्षे त्यांनी विधानपरिषदेचे सदस्य म्हणून महत्वाचे योगदान दिले. 1968 ते 1978 या काळात विधानपरिषदेचे उपसभापती, 1978 ते 1982 या काळात विधानपरिषदेचे सभापती पद म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. दिनांक 12 डिसेंबर, 1986 ते 1988 या काळात विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते पद त्यांच्याकडे आले.

सभापती महोदय, विधानपरिषदेत विविध जबाबदाऱ्या सांभाळत असताना सर्वसामान्य जनतेचे हित आणि राज्याचा सर्वांगीण विकास याला त्यांचे प्राधान्य राहिले. विधानपरिषदेतील त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणांनी राज्यासमोरील अनेक समस्यांवर, अडचणींवर मात करण्याचा मार्ग दाखविला.

सभापती महोदय, आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी माझ्यावर विधानपरिषदेच्या विरोधी पक्ष नेतेपदाची जबाबदारी सोपविल्यानंतर मी आर्वजून काही माजी विरोधी पक्ष नेत्यांच्या भाषणांचे संदर्भ वाचले. त्यात गवई साहेबांच्या सभागृहातील भाषणांचा समावेश होता. ज्या विषयावर बोलायचे त्याबद्दलचे गवई साहेबांचे ज्ञान, त्यांनी केलेला अभ्यास, त्यांची विषय मांडण्याची हातोटी आणि विषय मांडून तो सोडून न देता, त्या विषयाला न्याय देण्याची त्यांची कळकळ असे अनेक गुण मला त्यांच्य भाषणातून शिकायला, अनुभवायला मिळाले,हे मी कृतज्ञतापूर्वक नमूद करतो.

सभापती महोदय, खासदार म्हणून राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी सन्माननीय गवई साहेबांना मिळाली. या संधीचेही त्यांनी सोने केले. सन 1998-1999 च्या लोकसभा निवडणुकीत अमरावती मतदारसंघातून ते विजयी झाले. एप्रिल, 2000 मध्ये ते राज्यसभेवर निवडून आले. तेथेही त्यांनी आपल्या ज्ञानाचा, दूरदृष्टीचा प्रत्यय घडविला.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय, बिहार आणि केरळ राज्याचे राज्यपाल म्हणून काम करताना त्यांनी त्या राज्यांच्या विकासाकडे लक्ष दिले. परंतु तिथे त्यांनी महाराष्ट्र राज्याबद्दल आस्था, प्रेम आणि आदराची भावना निर्माण करण्याचेही काम केले. त्यांच्या राज्यपाल पदाच्या कार्यकालात महाराष्ट्र राज्याची प्रतिमा उंचाविण्याचाच त्यांचा प्रयत्न राहिला. त्यांच्या कारिकिर्दीत तिथे गेलेल्या अनेक महाराष्ट्रीय माणसांना त्यांचा स्नेह, आपुलकी आणि जवळीक अनुभवली आहे. आपल्यापैकी अनेक सन्माननीय सदस्य, पत्रकार आणि सर्वसामान्य नागरिक याचे साक्षीदार आहेत.

सभापती महोदय, विधिमंडळातील आमदार, संसदेतील खासदार किंवा सामाजिक चळवळीतील अग्रणी नेते म्हणून सन्माननीय गवई साहेबांनी केलेल्या प्रत्येक कृतीत आणि घेतलेल्या प्रत्येक निर्णयात आपल्याला समाजातील दुर्बल, वंचित, उपेक्षित घटकांना न्याय देण्याची, त्यांचा विकास साधण्याची भावना दिसते. गवई साहेबांच्या या कार्याबद्दल समाजानेही वेळोवेळी त्यांच्यावरील प्रेम व्यक्त करुन कृतज्ञता दाखवून दिली आहे.

सभापती महोदय, गवई साहेबांमुळे शासनाच्या अनेक विकास योजनांना गती मिळाली. राज्यात रोजगार हमी योजना सुरु व्हावी यासाठी त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती वि.स.पागे यांच्या सहकार्याने महत्वाचे काम केले. त्यातूनच राज्याच्या विकासाचा पाया मजबूत होण्यास मदत झाली.

सभापती महोदय, लोकप्रतिनिधी म्हणून विधिमंडळात जबाबदारी पार पाडत असताना विधिमंडळाबाहेरही त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला. आपल्या सहकाऱ्यांच्या साथीने अनेक क्षेत्रात त्यांचे काम सुरु होते. शिक्षण, उद्योग, सहकार, क्रीडा क्षेत्रात त्यांनी फार मोठे काम केले. नागपूर येथील दीक्षाभूमीच्या उभारणीत त्यांचे प्रमुख योगदान होते.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, मला या ठिकाणी प्रामुख्याने सांगितले पाहिजे की, मुंबई दंगलीनंतर समाजात शांतता आणि कायदा व सुव्यवस्थेचे वातावरण निर्माण करण्याचे मोठे आव्हान होते. ही जबाबदारी माननीय राज्यपाल महोदयांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या राज्य शांतता समितीवर सोपविण्यात आली होती. या समितीचे सदस्य म्हणून गवई साईबांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

महोदय, रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, नागपूर-दीक्षाभूमीच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष, अमरावतीच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष, अशा अनेक संस्था-संघटनांच्या माध्यमातून त्यांनी सर्व क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. मागासवर्गीय, अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी स्थापन करण्यात आलेल्या अनेक संस्था, संघटना आणि समित्यांवर त्यांनी काम केले. त्याचा उपयोग त्यांनी समाज परिवर्तनाच्या कार्यासाठी करुन घेतला. आपण ज्या समाजात जन्माला आलो त्या समाजातील प्रत्येक घटकाला चांगले जीवन जगता यावे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या घटनेच्या आधारावर समाजातील प्रत्येक उपेक्षित माणूस ताठ मानेने जगला पाहिजे, ताठ मानेने त्याने देशाचा एक नागरिक म्हणून पुढे आले पाहिजे, हीच भावना सन्माननीय गवई साहेबांच्या कामामध्ये आपल्याला दिसून येते. मी विधानपरिषदेचा विरोधी पक्ष नेता या नात्याने विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने, माझ्या परिवाराच्या वतीने आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने दोन्ही दिवंगत मान्यवरांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो व माझे भाषण संपवितो.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, भारताचे माजी राष्ट्रपती आणि श्री.रामकृष्ण सूर्यभान गवई, या सदनाचे माजी सभापती यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेल्या शोक प्रस्तावाला माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी समर्थन दिले आहे. सदरहू शोक प्रस्तावावर मी माझ्या भावना मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम साहेब यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडताना एक आगळी आणि वेगळी परिस्थिती पटकन लक्षात आली. कदाचित या हिंदुस्थानामध्ये अशा प्रकारचा शोक प्रस्ताव कधी आला नसेल आणि भविष्यातही येऊ नये. राज्याचे राज्यपाल हे राष्ट्रपतींचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असतात. या सदनामध्ये एकाच वेळी माजी राष्ट्रपती आणि माजी राज्यपाल यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला जात आहे. त्यामुळेच मी म्हटले की, हा आगळा-वेगळा योगायोग आहे. अशा प्रकारे या दोन्ही दिवंगत मान्यवरांना अनोखी श्रध्दांजली वाहण्याची परिस्थिती आज निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, लहानपणापासून आपण गाण्यांमध्ये किंवा कवितांमध्ये "आकांक्षा पुढे गगन ठेंगणे" या ओळी ऐकत आलो. ही जी भाव रचना केलेली आहे तिला पूर्ण अर्थाने आपल्या यौवनामध्ये आकाशाला गवसनी घालण्याचे काम करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम होय. या देशाने चाचा नेहरु पाहिले. त्यांची जयंती बालदिन म्हणून साजरी केली जाते. डॉ.कलाम यांनी त्यांच्या पुढे एक पाऊल टाकले. लहान मुले जेव्हा शिक्षण घेण्याच्या किंवा त्यांनी खऱ्या अर्थाने आकाशाला गवसनी घालावी अशा वयात येतात, त्यावेळी त्यांनी नेमके काय करावे असे सांगणारे डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम होता. पंडीत नेहरुंनंतर, 'कलाम अंकल' नावाने आपले व्यक्तिमत्त्व रुजविणे हे सोपे काम नव्हते. संपूर्ण हिंदुस्थानातील उच्च शिक्षित, अगदी आयआयटी पासून, विज्ञानापासून ते महाविद्यालयापर्यंत लोकांना अनेक हिरो, नट, व्यक्तिमत्त्व, लेखक आवडतात. परंतु राष्ट्रपती पदावर पोहचलेले उत्तुंग व्यक्तिमत्त्व आपले आहे असे वाटावे, अशा प्रकारचे आगळे-वेगळे ज्ञानपीठ निर्माण करण्याचे सामर्थ्य असणारे व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेले आहे.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, या देशाला अनेक राष्ट्रपती लाभले. राष्ट्रपती पदापर्यंत जाण्याची प्रत्येकाची आपापली वेगळी उंची असते. ज्या पक्षाचे केंद्रामध्ये सरकार असते त्यांच्या माध्यमातून, पक्षात सर्वार्थाने ज्येष्ठत्वाला पोहचल्यानंतर त्यांचा सन्मान म्हणून त्यांना राष्ट्रपती बनविले जाते. हा त्यांच्यासाठी मोठा सन्मान असतो. या सर्व सन्मानामध्ये दोन वेगळ्या पध्दती निर्माण झाल्या. राजकारणाची पार्श्वभूमी नसलेले किंवा राजकारणाशी संबंध नसलेले डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम हे एक होय. डॉ.राजेंद्र प्रसाद हे स्वातंत्र्य युध्दापासून आलेला काँग्रेसचा वेगळा चेहरा होता, व्यक्तिमत्त्व होते. त्यानंतर शिक्षक असलेल्या सर्वपल्ली डॉ.राधाकृष्णन यांना राष्ट्रपती म्हणून स्वीकारले गेले. त्यांना कोणताही राजकीय चेहरा नव्हता, परंतु या देशात त्यांना शिक्षकी चेहरा या नात्याने राष्ट्रपती म्हणून स्वीकारले गेले. परंतु वर्षानुवर्षांपासून एकमेव अशा डॉ.राधाकृष्णन यांचा जन्मदिवस हा 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो.

सभापती महोदय, शोक प्रस्तावावर भावना मांडताना माननीय मुख्यमंत्र्यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या संपूर्ण कामाचा उल्लेख केला. त्यांनी आईबद्दलच्या भावना विशिष्ट पध्दतीने व्यक्त केलेल्या आहेत. मातृ हृदय ज्यांच्या मनात ठसलेले आहे त्याची भक्ती माणसाला जगामध्ये संस्कारक्षम बनवून, त्याला नेहमीच पुढे घेऊन जाते. डॉ.अब्दुल कलाम यांनी शैक्षणिक, वैज्ञानिक आणि विविध विभागांमध्ये केलेल्या कार्याची नोंद झालेली आहे.

सभापती महोदय, रशिया, अमेरिका, जर्मन आणि फ्रान्स हे देश आकाशाला गवसनी घालत होते किंवा त्यांचे उपग्रह आकाशात जात होते. डॉ.कलाम यांच्या बुध्दिमत्तेतून साकारलेले आणि त्यांच्या विज्ञानक्षम अशा संकल्पनेच्या ठाम निर्धारातून निर्माण झालेले पहिल्या 'अग्नि' आणि 'पृथ्वी' क्षेपणास्त्राचे यशस्वी उड्डाण झाले त्यावेळी गगणात भारत सुध्दा झेप घेऊ शकतो हे जगाने पाहिले. जगाला थक्क करणारे विज्ञान आमच्याकडेही आहे हे ठामपणे सांगण्याचे कर्तृत्व त्यांच्यात होते. ते अणुशास्त्रज्ञ सुध्दा होते. अणुशास्त्र हे मानवी विकासासाठी कसे वापरता येईल, या दृष्टीने त्यांची अलीकडच्या काळातील व्याख्याने होती. निसर्ग आणि अणुशास्त्र यांचा मेळ घालून पर्यावरण जपत, अणुशास्त्र कसे विकसित करावे हे त्यांनी जाणले.

सभापती महोदय, राष्ट्रपती पदावरुन निवृत्त झाल्यानंतर सुध्दा डॉ.अब्दुल कलाम यांना सातत्याने विज्ञान क्षेत्रातून प्रचंड मागणी येत होती. ते सर्व देशभर जात होते. सर्वांना ज्ञान देत

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते....

होते. कालच्या कार्यक्रमात ते भाषण करीत असताना त्यांच्यावर ही परिस्थिती ओढवली. ते हिंदुस्थानचे एकमेव 'मिसाईल मॅन' होते. त्यांना अनेक भूषणं असले तरी गगनाला गवसनी घालण्याचे आणि क्षेपणास्त्रातून आकाशात झेप घेण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या अनेक पुस्तकांचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. त्यांच्या एका पुस्तकाचे नाव 'टेक माय जर्नी बियाँड' आहे. म्हणजे मी विज्ञान क्षेत्रात जे आत्मसात केले त्याच्या पुढचे पाऊल टाका. अशा प्रकारे सांगणारे त्यांचे तत्त्वज्ञान उद्याच्या विद्यार्थ्यांना दीपस्तंभासारखे ठरेल, अशा प्रकारचे काम त्यांनी संपूर्ण हिंदुस्थानात केले आहे.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते ....

सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या राष्ट्रपती पदाच्या संदर्भात जे सांगितले ते फार मोलाचे आहे. कार्यक्षम असणाऱ्या, त्याग करणाऱ्या व्यक्तीला सर्वोच्च असे राष्ट्रपती पद मिळाले. पक्षाच्या, राजकारणाच्या पलीकडे असलेल्या व्यक्तिमत्वाला राष्ट्रपती पदावर नेण्याचे काम माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी केले, त्यावेळच्या त्या सर्व विचारांनी केले. हा देश मोठा आहे, त्यामुळे देशातील मोठे व्यक्तिमत्व त्या पदावर बसले पाहिजे असा विचार मांडला गेला आणि त्याला महत्त्व आहे. देशातील त्या वेळच्या सरकारने विविध गुण-संपन्नता पुढे घेऊन गेले पाहिजे हा जो विचार मांडला त्यालाही महत्त्व आहे. मी आता विधानसभेतील भाषणे ऐकत होतो, त्यावेळी माननीय शिक्षणमंत्र्यांनी सांगितले की, भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिन "वाचन दिन" म्हणून साजरा करूया. परंतु मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम साहेबांचा जन्म दिन "विज्ञान दिन" म्हणून साजरा झाला पाहिजे. तज्ज्ञ लोकांनी त्या दिवशी सर्व जिल्ह्यांतील सर्व भागांत जाऊन विज्ञान विषयावर विज्ञानाची कास धरून भाषणे करून, वेगवेगळ्या विज्ञानाची ओळख करून द्यावी. कृषी क्षेत्रामध्ये वैज्ञानिकदृष्ट्या गती घेतली तर कित्येक अब्ज टन धान्य निर्माण होऊ शकेल, भविष्यात कितीही भीषणात आली तरी लोकांच्या तोंडचा घास काढला जाणार नाही असे सामर्थ्य विज्ञानामध्ये असल्याचे त्यांनी सांगितले. भारताला सर्वार्थाने दिशा देणारे, सामर्थ्य देणारे, वैज्ञानिकतेकडे नेणारे असे हे आगळेवेगळे व्यक्तिमत्व होते. भारत देश धार्मिक आहे. सर्व जातींधर्मांमध्ये धार्मिकता महत्वाची असली तरी सुध्दा विज्ञानाकडे नेणारे, वैज्ञानिक मानसिकता निर्माण करणारे असे हे व्यक्तिमत्व आपण हरवून बसलो आहोत.

सभापती महोदय, श्री. दादासाहेब गवई हे सर्वांच्याच परिचयाचे आहेत. ते विधानपरिषदेचे सभापती होते. आपण शालेय जीवनात होतो. ते सन 1964 ते सन 1993 या कालावधीमध्ये या सदनाचे सदस्य होते. तसेच लोकसभा व राज्यसभा येथेही सदस्य होते. ते माननीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिक्षा दिनाचे साक्षीदार होते. दिक्षा दिनाच्या वेळी जे काही घडले त्याचे वर्णन माननीय मुख्यमंत्र्यांनी भाषणात केले आहे. दिक्षा दिनाचे ते साक्षीदार होते, त्यांनी ते उभे केले. जीवनात त्यांनी काय उभे केले, पक्ष उभा केला का, संघटना उभी केली का, दलित



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते ....

चळवळ उभी केली का ? त्यांनी तेवढेच नव्हे तर दलित जेथे नतमस्तक होतात, करोडो लोकांसाठी पूज्यनीय असे एक स्थान उभे करून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना जबाबदारी दिली ती पार पाडून, चिरंतन असे वेगळे कायमचे धम्मचक्र निर्माण केले. दादासाहेबांशी माझा जवळचा संबंध होता. सामाजिक अन्यायाची घटना घडली की मला तिडीक येते. सामाजिक अन्यायाच्या घटनेच्या संदर्भातील तिडीक समर्थपणे व्यक्त झाली पाहिजे असे माझे जडणघडण झाले आहे. माझा व्यक्तिगत चिडखोर स्वभाव नाही. मात्र सामाजिक अन्याय झाला तर मला खूप चीड येते. मला आठवते की, भंडारा येथे एका दलित महिलेची नग्न धींड काढण्यात आली होती. मला त्याची चीड येते. मी सभागृहात होतो. मी त्या संदर्भात भाषण देखील केले आहे. मला आठवते आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे सरांना देखील हे माहीत आहे. तेही त्या गावात गेले होते आणि मीही गेलो होतो. (अडथळा) खैरलांजी नव्हे. जालनामध्येही घडले. मी सगळीकडे जातो. प्रसिध्दी व्हावी असे कधी मी केले नाही. हे नेतेगीरीचे काम नाही. सामाजिक काम असते. उद्ध्वस्त जीवनाला सांत्वनाचे सामर्थ्य देणारे काम असते. त्यावेळी भंडाऱ्यामध्ये किळसवाणी घटना घडली होती. मला आठवते की, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे सरही तेथे गेले होते. मी पश्चिम विदर्भामध्ये त्या तिडीकीतून पक्षाचे काम करीत होतो. मी महिलांच्या अत्याचाराच्या संदर्भात महिलांचा मोर्चा जाहीर केला होता. मी हा मोर्चा का काढत आहे या संदर्भात मोर्च्याच्या अगोदर पुस्तिका काढली होती आणि त्यामध्ये रेखाचित्र काढतात तसे रेखांकन होते. आम्ही सहन का करावे ? त्यामध्ये महिलेची नग्न धींड, महिलेचे चित्र काही नाही. मी अकोल्याला असताना मला दादासाहेबांच्या कार्यकर्त्याने फोन केला आणि मला दम दिला. तुम्ही आमच्या महिलेच्या धींडीचा फोटो चित्रीकरण केले, अमुक केले, तमुक केले, मोर्चा होऊ देणार नाही असे म्हणाला. मी कशासाठी मोर्चा काढत आहे आणि हे काय करीत आहेत याचे मला वाईट वाटले. मी ते केले नाही. मी रात्री फोन केला आणि सांगितले की, दादासाहेब असे झाले आहे, तुमचा कार्यकर्ता होता. ते मला म्हणाले की, मी तुला एक गोष्ट सांगतो की, तुझ्या भावना कितीही चांगल्या असल्या आणि ते मला जावणत असले तरीही पण तू ते करू नको. मी ती पुस्तिका रातोरात मागे घेतली. माझ्या शिवसैनिक कार्यकर्त्यांनी पोस्टर्स काढून टाकली. दुसऱ्या दिवशी एक लाखांच्या वर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते ....

महिलांचा मोर्चा निघाला होता आणि आदरणीय श्री. उद्धवजी ठाकरे यांनी त्याचे नेतृत्व केले होते. भंडाऱ्यामध्ये एका महिलेवर झालेला अत्याचार होता. अन्यायग्रस्त महिलांच्या संदर्भातील विशाल मोर्चा त्यावेळी अमरावतीमध्ये निघाला, त्यानंतर एवढा मोठा मोर्चा निघाला नाही. ही सामाजिक जाणिवेतील चीड होती. मला संध्याकाळी त्यांचा फोन आला. मोर्चा इतका प्रचंड, भव्य होता की, तो कोणालाही अपेक्षित नव्हता. मोर्च्यात लाखांच्या वर महिला होत्या. मला ते म्हणाले की, आज दलितांसाठी लढणारा दलित नसलेला तुझ्यासारखा नेता आहे. मी लढत नाही. समाजातील या घटनेच्या तीव्र भावना माझ्या नेतृत्वाने घडविल्या आहेत आणि त्यांच्या तुम्ही परिचयाचे आहात. तुम्ही सर्व समकालीन मंडळी आहात. समाज असा असावा असे म्हणणारे ते दादासाहेब मी पाहिले आहेत.

सभापती महोदय, आमची एक समिती केरळला गेली होती, विधानमंडळ सचिवालयाचे उप सचिव श्री. आठवलेंनी धावत-पळत माननीय राज्यपालांची भेट ठरवली आणि त्या दिवशी माननीय राज्यपालांकडे नेले. मला कळेना, माझ्या लक्षात आले नाही की, तेथे दादासाहेब आहेत. जवळजवळ 1 तास आमच्या समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांबरोबर महाराष्ट्रातील विविध भागातील माहिती घेत दादासाहेबांनी आम्हाला चहापान केले. न हसणारे दादासाहेब कोणी पाहिले आहेत का हा प्रश्न विचारला तर असा कोणीही सापडणार नाही. त्यांचा कायम हसरा, प्रसन्न चेहरा होता, त्यांच्याकडे बघितल्यानंतर टेंशन निघून जावे असे ते आगळेवेगळे व्यक्तिमत्व होते. आपल्यातून ते निघून गेले आहे. मी माझ्या पक्षाच्या वतीने, माझ्या वतीने, माझ्या कुटुंबीयांच्या वतीने आणि सभागृहातील माझ्या सन्माननीय सदस्यांच्या वतीने दोन्ही थोर व्यक्तिमत्वांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी सदनात भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, भारताचे माजी राष्ट्रपती, श्री. रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व माजी राज्यपाल म्हणजेच दादासाहेब गवई यांच्या निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव मांडला आहे, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा त्या संदर्भात भावना व्यक्त केल्या आहेत. मी देखील त्या संदर्भात माझ्या भावना व्यक्त करण्याकरिता येथे उभा आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या संदर्भात भावना व्यक्त करताना बऱ्याच गोष्टी सांगितल्या. ते महान शास्त्रज्ञ होते, त्यांचा जगाच्या पाठीवर सर्व ठिकाणी गौरव झाला होता. सातत्याने त्यांनी काम केले, त्यांच्याकडून या क्षेत्रात मार्गदर्शनाची गरज होती आणि अशा वेळी आपल्यामधील एक महान शास्त्रज्ञ निघून गेले आहेत आणि त्याबद्दलच्या भावना, हळहळ सदनातील सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी, माननीय मुख्यमंत्र्यांनी व सर्व सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे.

सभापती महोदय, ते अत्यंत गरीब, हालाखीच्या परिस्थितीत राहत होते, त्यांनी पेपर विकून आपला चरितार्थ चालविला, लहान-मोठी कामे करुन शिक्षण घेतले, त्यांच्या भगिनींनी त्यांच्या अंगावरील दागिने विकून त्यांना उच्च शिक्षण देण्याकरिता कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

सभपती महोदय, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम साहेबांचा संपूर्ण जीवन प्रवास किंवा त्यांचे जीवन चरित्र पाहिले तर त्यांचा जन्म गरीब घरात झाला होता. शिक्षणाची कोणतीही व्यवस्था नव्हती, शिक्षण घेण्यासारखी त्यांची आर्थिक स्थिती नव्हती. परंतु, या सर्वांवर मात करुन ते ज्या जिद्दीने आणि ज्या वेगाने वैज्ञानिक म्हणून किंवा शास्त्रज्ञ म्हणून पुढे आले, तो प्रवास देशावासियांनाच नव्हे तर जगातील लोकांनाही थक्क करणारा आहे.

सभापती महोदय, डॉ.कलाम यांनी नासामध्ये काम केले होते. तेथून भारतात आल्यानंतर त्यांच्यावर देशाने महत्वाच्या जबाबदाऱ्या सोपविल्या होत्या. संपूर्ण जगात भारत हा देखील अण्वस्त्रसज्ज, बलाढ्य असा देश आहे, असा नावलौकिक आपण त्यांच्यामुळेच मिळवू शकलो. डॉ.कलाम साहेबांनी संशोधन क्षेत्रात केलेल्या कामामुळेच संपूर्ण जगात भारताला महत्वाचे स्थान मिळू शकले आहे.

सभापती महोदय, डॉ.कलाम साहेबांचा जन्म दिनांक 15 ऑक्टोबर, 1931 मध्ये झाला. सन 1954 ते 1957 मध्ये त्यांनी मद्रास इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीतून हवाई अभियांत्रिकी विषयात पदवी संपादन केली. त्यानंतर सन 1958 मध्ये डिफेन्स ॲण्ड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशनमध्ये सहायक शास्त्रज्ञ म्हणून त्यांनी नोकरीला सुरुवात केली. त्यानंतर भारताच्या विमान ओव्हर क्राफ्ट विकसित करणाऱ्या चमूच्या प्रमुखपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली. त्या कामातही त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यानंतर स्व.इंदिराजी गांधी यांनी इंटिग्रेटेड लाईटवेट मिसाईल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम सुरु केला. त्याचे पहिले संचालक श्री.सतिश धवन हे होते व त्यानंतर संचालक पदाची धुरा डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्यावर सोपविण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली पोखरण येथे दोन वेळा अणु चाचण्या घेण्यात आल्या आणि भारत हा एक शक्तीशाली देश आहे, या दृष्टीकोनातून जगाचे लक्ष भारताकडे वळले. त्यावेळी अमेरिका व अन्य काही राष्ट्रांनी या अणु चाचण्यांना विरोध केला व त्यामुळे भारतावर साधारणपणे 9 ते 10 वर्षे जागतिक बंधने घालण्यात आली होती. परंतु, संपूर्ण जगामध्ये भारताची मान उंचावण्याचे काम डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी केले, हे निर्विवाद आहे.

..2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

सभापती महोदय, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम हे या देशाचे राष्ट्रपती झाले. राष्ट्रपती झाल्यानंतर त्यांची लोकप्रियता तुम्ही, आम्ही अनुभवली आहे. त्यांचा राष्ट्रपती पदाचा कार्यकाळ संपल्यानंतर ते पुन्हा एकदा देशाचे राष्ट्रपती झाले पाहिजेत, अशी देशवासियांची इच्छा होती. त्यांच्या संपूर्ण राष्ट्रपती पदाच्या कार्यकाळात त्यांनी मुलांशी जवळीक निर्माण केली. लहान मुले ही देशाचे भविष्य आहेत, असा त्यांचा दृष्टीकोन होता. युवकांना विज्ञानाचे शिक्षण मिळाले पाहिजे, हा देश या क्षेत्रात पुढे आला पाहिजे, यासाठी त्यांनी राष्ट्रपती पदी असताना आणि त्यानंतरही भरपूर काम केले आहे.

सभापती महोदय, काल मेघालय येथे व्याख्यान देत असताना डॉ.कलाम यांना ह्रदयविकाराचा झटका आला आणि त्यातच त्यांना मृत्यू ओढवला. यापूर्वी एकदा ते प्रवास करीत असलेल्या हेलिकॉप्टरला मध्य प्रदेशमध्ये अपघात झाला होता व त्यावेळेसही ते व्याख्यानासाठीच जात होते. अशा प्रकारे त्यांनी देशाला समृध्द व सुदृढ करण्याचा ध्यास घेतला होता. युवकांना स्वप्न दाखविण्याचे आणि त्यांच्यामध्ये स्फुर्ती जागविण्याचे काम ते अखेरपर्यंत करीत होते. या पूर्वीही एक-दोन वेळा त्यांची प्रकृती बिघडली होती व त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले होते. परंतु, देशप्रेमापायी त्यांनी कधीही आपल्या कामातून निवृत्ती घेतली नाही. या देशाला दिशा देण्याचे काम त्यांनी शेवटपर्यंत केले. या देशातील सर्व बांधव एकत्र आहेत, देशात वेगवेगळ्या धर्माचे लोक रहात असले तरी या देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाने देशाची मान उंचावण्याचा प्रयत्न करावा, हा संदेश देण्याचे कामही त्यांनी केले.

सभापती महोदय, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी संशोधन क्षेत्रात काम करीत असताना अनेक उपग्रह कार्यक्रमांवर काम केले आहे. सुरुवातीला आपल्याला अशी शक्यताही वाटत नव्हती की, आपला देश स्वतःच्या ताकदीवर उपग्रह अंतराळात सोडू शकेल. त्यावेळी सर्व उपग्रह नासावरुनच सोडली जात असत. त्यामुळे त्यावेळी अशी चर्चा होत असे की, जो देश अवकाशात उपग्रह सोडतो तो सर्वोच्च आहे. याच देशाने चंद्रावर यान सोडून अवघे अवकाश व्यापून टाकण्याचे काम केले होते. परंतु, आपला देशही या क्षेत्रात मागे नाही, हे दाखवून देण्याचे काम डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी केले, हे आपल्याला विसरता येणार नाही. ...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

सभापती महोदय, डॉ.अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ 'विज्ञान दिवस' सुरु करावा, अशा प्रकारचा प्रस्ताव माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी मांडला आहे. हे खरे आहे की, डॉ.अब्दुल कलाम यांनी विज्ञान क्षेत्राविषयी संपूर्ण देशाला जागरूक आणि प्रेरित केले आहे. त्यांच्याविषयी या देशातील युवकांना देखील प्रेम आहे. उच्च व तंत्र शिक्षण घेणाऱ्या युवकांशी ज्यावेळी आपण चर्चा करतो त्यावेळी असे लक्षात येते की, डॉ.कलामांचे वास्तव्य युवकांच्या मनात आहे, त्यांना कलामांचे खूप महत्व आहे. डॉ.कलाम यांनी देशाला भरभरुन दिले आहे. देशाला पुढे नेण्याचे, जागतिक पातळीवर सन्मान मिळवून देण्याचे, नावलौकिक मिळवून देण्याचे काम त्यांनी केले आहे. अशा एका महान, उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या शास्त्रज्ञाला आपण मुकलो आहोत.

सभापती महोदय, माजी राज्यपाल, विधान परिषदेचे माजी सभापती आणि जवळ जवळ 30 वर्षे या सदनाचे सदस्य राहिलेले माननीय दादासाहेब उर्फ रा.सू.गवई यांचे सुध्दा नुकतेच निधन झाले आहे.

सभापती महोदय, मा.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आणि माननीय दादासाहेब या दोन्ही नेतृत्वांचा सामाजिक दृष्टीकोन त्यांच्या कार्यामधून आपल्याला दिसून येतो.

सभापती महोदय, माननीय रा.सु.गवई यांना आम्ही लहानपणापासून पहात आलो आहोत, त्यांची अनेक व्याख्याने आम्ही ऐकली आहेत व त्यांचे सदनातील कामही बघितले आहे. सभापती म्हणून त्यांची काम करण्याची पध्दत आम्ही पाहिली आहे. एखाद्या विषयात सामाजिक बॅलन्स ठेवणारे आणि मार्ग काढाणारे नेतृत्व या राज्याला दादासाहेबांच्या रूपाने मिळाले होते.

सभापती महोदय, ज्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाचे नेतृत्व केले, त्या बाबासाहेबांच्या विचारांचा खरा पाईक कोण असेल तर ते रा.सु.गवई होते, हे आपल्याला मान्य करावे लागेल. त्यांनी या विचारांशी सातत्याने बांधिलकी ठेवली. शाहु, फुले, आंबेडकरांच्या विचारांवर अगाध श्रध्दा असलेल्या माननीय दादासाहेबांनी त्यांच्या विचारांचा सातत्याने पाठपुरावा केला. या राज्यामध्ये शाहु, फुले, आंबेडकरांचे विचार तेवत राहिले पाहिजेत, याकरिता आर.पी.आय.ची मोट बांधण्याचे काम सन 1998 मध्ये दादासाहेबांनी केल्याचे आपल्या सर्वांनाच आठवत असेल. त्यावेळी

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

कॉंग्रेस आणि आर.पी.आय.चे सर्व गट एकत्र करण्याचे काम त्यांनी केले. या माध्यमातून प्रा.जोगेंद्र कवाडे साहेब, श्री.प्रकाश आंबेडकर साहेब, रा.सू.गवई साहेब, श्री.रामदास आठवले साहेब हे खासदार झाले. या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे उपस्थित आहेत व त्यांनाही त्या गोष्टीचा अभिमान आहे.

सभापती महोदय, राज्य कशाप्रकारे चालले पाहिजे, या विषयी दादासाहेबांचे विचार स्पष्ट होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रखर विचारातून हा देश पुढे घेऊन जायचा असेल तर सामाजिक दृष्टीकोन ठेवणे गरजेचे आहे, असे त्यांचे मत होते आणि त्या दृष्टीने राज्याच्या राजकारणात दादासाहेबांना एक वेगळे महत्व होते.

सभापती महोदय, दादासाहेबांचा जीवन प्रवास गरिबीतून सुरु झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सूर्यभान असे होते व त्याना चार मुली होत्या. त्यांना मुलगा नव्हता. त्यांना पाचवा मुलगा झाला, म्हणजे दादासाहेबांचा जन्म झाला तो दिवस लक्ष्मी पूजनाचा होता. सर्व गाव फटाके फोडत असताना त्यांचा जन्म झाला. दादासाहेबांच्या वडिलांचे एक मित्र त्या गावामध्ये होते. त्यांनी दादासाहेबांच्या जन्माच्या निमित्ताने बंदुकीतून फायरिंग करुन आनंद व्यक्त केला होता.

यानंतर श्री.बोरले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.......

संपूर्ण गावात आनंदोत्सव होता. 4 मुलीनंतर मुलाचा जन्म झाला होता. त्यांच्या वडिलांकडे 5-7 एकर जमीन होती. त्यांची शिक्षण घेण्यासारखी देखील परिस्थिती नव्हती. त्यांचे कुटुंब फार सदन आहे, अशा प्रकारची परिस्थिती नाही. परंतु, त्या परिस्थितीवर मात करुन पुढे येण्याचे काम दादासाहेबांनी केले.

सभापती महोदय, ज्यावेळी आरपीआयच्या सभा असायच्या त्यावेळी आम्ही त्यांच्या सभांना जात होतो. दादासाहेबांच्या सभेला प्रचंड गर्दी होत होती. आम्ही अनेक वेळा त्यांच्या सभांना 50 हजार ते 1 लाख एवढ्या मोठ्या संख्येने लोक उपस्थित असल्याचे बघितले आहे. मघाशी मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांच्याकडे गेल्यानंतर ते तुझे कसे काय सुरु आहे, तुझे वडील काय करतात, अशी विचारणा करीत असत. कोणताही कार्यकर्ता त्यांच्याकडे गेल्यानंतर त्यांनी त्या कार्यकर्त्याच्या कुटुंबाविषयी विचारणा केली नसेल असे कधी होत नव्हते. कोणताही कार्यकर्ता त्यांच्याकडे आल्यानंतर ते त्याला प्रथम तुझे कसे काय सुरु आहे, व्यवस्थित सुरु आहे की नाही, तुझ्याबद्दल चांगले ऐकले आहे, तुझ्या वडिलांचे काय सुरु आहे, मुले कशी आहेत, अशा प्रकारची विचारणा करीत असत. सर्वांना बरोबर घेऊन जाणारे असे त्यांचे नेतृत्व होते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कोणताही अतिरेक नव्हता. कोठे तोडफोड झाली पाहिजे, वादंग निर्माण झाले पाहिजे आणि त्यावर आपण राजकारणाची पोळी भाजून घेतली पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न त्यांनी आयुष्यात कधीही केला नाही. राज्यात सामाजिक ऐकता अबाधित राहिली पाहिजे, या दृष्टीकोनातून दादासाहेबांनी संपूर्ण आयुष्यभर प्रयत्न केले.

सभापती महोदय, दादासाहेबांनी अनेक महत्वाची पदे भूषविली आहेत. त्यांनी 5 वर्षे राज्यसभेचे सदस्य, 5 वर्षे लोकसभेचे सदस्य आणि 30 वर्षे विधानसभेचे सदस्य म्हणून कार्य केले आहे. त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम केले. ज्यावेळी त्यांची तब्येत बरोबर नव्हती, त्यावेळी आम्ही नागपूर येथे 2-3 वेळा त्यांना भेटण्यासाठी गेलो होतो. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही त्यांना रुग्णालयात भेटण्यासाठी गेलो त्यावेळी त्यांची तब्येत थोडी बरी होती. त्यावेळी ते आमच्याशी बोलले. त्यांनी आम्हाला सांगितले की, मी आजच रुग्णालयात ॲडमिट झालो आहे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.......

त्यावेळी माननीय श्री.नितीन राऊत साहेब आणि इतरही काही लोक त्यांच्या बरोबर होते. त्यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. एकूणच त्यांची तब्येत बिघडत गेली. त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा झाली नाही. आम्ही त्यांच्या अंत्यविधीसाठी गेलो होतो. त्यांच्या अंत्यविधीला जवळपास 50-60 हजार लोक उपस्थित होते. सकाळी 10.00 ते 11.00 वाजता त्यांच्या अंत्ययात्रेला सुरुवात झाली आणि सायंकाळी 5.30 ते 6.00 वाजता शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्यविधीला प्रचंड जनसमुदाय लोटला होता. आमचे नेतृत्व आमच्यातून निघून गेले आहे. अनेकांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते. त्यांनी आयुष्यात सातत्याने शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारानुसार काम केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जी दिशा दाखवून दिली त्या प्रमाणे त्यांनी काम केले, अशा प्रकारचे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

सभापती महोदय, डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना भारतरत्न पुरस्कार मिळाला, त्यांनी देशाचा सन्मान वाढविला आणि कै.रा.सू.गवई यांनी सामाजिक दृष्टीकोनातून संपूर्ण राज्याला एकत्र आणण्याचे काम केले. मी माझ्या वतीने, माझ्या कुटुंबीयांच्या वतीने, सन्माननीय सदस्यांच्या वतीने आणि भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या वतीने या दोन्ही महात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम, भारताचे माजी राष्ट्रपती व कै.रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती, विधानपरिषद व माजी राज्यपाल यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, एखाद्या मोठ्या व्यक्तीचे निधन झाले तर मोठ्यांच्या चर्चेपलीकडे मुलांच्या जगात त्याला फारसे स्थान नसते. परंतु, मी पहिल्यांदाच असे बघितले की, या देशातील लहान मुले काल रात्रीपासून अस्वथ झालेली आहेत. कारण, त्यांचे प्रिय कलाम चाचा या जगातून गेले आहेत. भारतरत्न अब्दुल पाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम यांचे काल संध्याकळी अवचित निधन झाले. तुमच्या आमच्यासाठी माजी राष्ट्रपतींचे निधन झाले. भारताला शक्तीवान बनविणाऱ्या 'मिसाईल मॅन'चे निधन झाले, महान शास्त्रज्ञाचे निधन झाले. कदाचित, ही कसर उद्या भरुनही निघेल. परंतु, मुलांचे कलाम चाचा गेले, ही कसर कशी भरुन निघणार आहे ? देशातील मुलांशी, तरुणाईशी, विद्यार्थ्यांशी बोलू शकणारा दुसरा नेता कोण आहे ? पंडित नेहरु देशाचे पहिले पंतप्रधान होते. पंडित नेहरु मुलांचे पहिले चाचा होते. साठ वर्षानंतर मुलांना दुसरे चाचा मिळाले. मुलांना राष्ट्रपतींची नावे विचारली तर मुले प्रथम भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे नाव सांगतील. ते देशातील तरुणाईपर्यंत आणि उद्याच्या पिढीपर्यंत पोहोचलेले पहिले राष्ट्रपती होते. कलाम साहेब, मुलांशी इतक्या सहजपणे कसे काय बोलू शकत होते, देशातील उद्याच्या पिढीमध्ये ते सहज स्वप्न कसे पेरत होते ? ही कला त्यांना कोठून अवगत झाली ? मघाशी मुख्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे याचे रहस्य त्यांच्या मातृप्रेमात होते. मुलांशी बोलू शकणारा, उद्याच्या पिढीत स्वप्न पेरु शकणारे महान प्रतिभावंत कवी साने गुरुजी महाराष्ट्राने अनुभवले आहेत. आईचे हृदय त्यांच्याकडे होते. असेच आईचे हृदय कलाम चाचांकडेही होते. त्यांनी लहानपणातील एक आठवण लिहून ठेवलेली आहे. आईच्या मांडीवर डोके टेकून झोपलेल्या छोट्या कलामांच्या चेहऱ्यावर आईच्या डोळ्यातील अश्रू ओघळले त्यावेळची आठवण त्यांनी आपल्या पुस्तकात लिहून ठेवलेली आहे. तिच्या भेटीसाठी ते अत्यंत व्याकूळ होते. कयामतला पुन्हा भेटू, असे ते आपल्या

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील.........

कवितेतून म्हणतात. पालगडच्या समुद्रावर आई, आई अशी हाक मारणारा छोटा श्याम असेल किंवा कयामतच्या दिवशी तुला मी भेटेन, असे सांगणारे कलाम चाचा असतील ते आज आपल्यातून निघून गेले, हे सर्वात मोठे नुकसान आहे.

सभापती महोदय, कलाम साहेबांना एअरफोर्समध्ये पायलट व्हायचे होते. एकूण आठ जागा होत्या आणि त्यांचा नववा क्रमांक आला होता. म्हणून त्यांना संधी मिळाली नाही. त्यांचे स्वप्न पूर्ण झाले नाही. परंतु, कलाम साहेबांच्या संशोधनातल्या पायलटगिरीमुळे अवकाश संशोधनात भारताने जगाला चकित करणारी झेप घेतली. त्यांच्या क्षेपणास्त्रांमुळे ते 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जातात. नाग, पृथ्वी, अग्नी या त्यांच्या क्षेपणास्त्रांनी भारताला हवाई संरक्षण मिळवून दिले. ही क्षेपणास्त्रे डागण्यासाठी, भीती दाखविण्यासाठी नाहीत, तर हे अग्नी गोल, हे अग्नी पंख भारतीय भावनांचे, अस्मितांचे प्रतिक आहेत, असे त्यांनी लिहून ठेवले आहे. भारत आक्रमक नाही, हिंसक नाही. परंतु, भारत सुसज्ज आहे, सशस्त्र आहे, उन्नत आहे आणि कोणापुढेही झुकणारा नाही. म्हणून शांतीचा वाहक आणि आश्वासक आहे. ही आश्वासकता देशाला मिळवून दिली, ती कलाम साहेबांच्या संशोधनाने. एकाच वेळी ईश निष्ठा, देश निष्ठा आणि विज्ञान निष्ठा यांचा सुंदर मिलाप कलाम साहेबांकडे होता.

सभापती महोदय, कै.प्रमोद महाजन यांनी सांगितलेली एक आठवण मी या निमित्ताने सांगू इच्छितो. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम साहेबांचा राष्ट्रपती पदासाठी अर्ज भरावयाचा होता. कोणत्या मुहूर्तावर अर्ज भरावयाचा, असे कै.महाजन साहेबांनी त्यांना विचारले. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम साहेब त्यांना म्हणाले की, ही पृथ्वी सूर्याभोवली फिरते, म्हणून वर्ष होते आणि स्वत:भोवती फिरते म्हणून दिवस-रात्र होते. याचा अर्थ, प्रत्येक दिवस आणि प्रत्येक रात्र सूर्याचा आणि पृथ्वीचा आहे. त्यामुळे प्रत्येक दिवस आणि प्रत्येक क्षण शूभ आहे. मी कोणत्याही क्षणी, कोणत्याही दिवशी अर्ज भरायला तयार आहे, अशा प्रकारची विज्ञान निष्ठा त्यांनी दिलेली आहे.

सभापती महोदय, राष्ट्रपती म्हणून काम करताना फाशीच्या शिक्षेवर निर्णय घेणे हे सर्वात अवघड काम आहे, असे त्यांनी लिहून ठेवलेले आहे. त्यांनी 50 मृत्यूदंड माफ केले. परंतु, त्यांनी

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील........

1 मृत्यूदंड माफ केला नाही. कलकत्ता येथील धनंजय चॅटर्जी याला त्यांनी माफी दिली नाही. त्यांनी आपल्या 'टर्निंग पॉईंट' पुस्तकात लिहिले आहे की, त्या माणसाने एका निष्पाप मुलीवर अत्याचार केला, बलात्कार केला आणि त्या मुलीला ठार मारले. म्हणून मी त्याला माफी दिली नाही. सामाजिक आणि आर्थिक भेदभावांमुळे अशी मृत्यूदंडाची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत आणि ही सर्वात वाईट गोष्ट आहे, असे त्यांनी आवर्जून लिहिले आहे.

सभापती महोदय, कलाम साहेब भारतीय संस्कृतिचे मूर्तीमंत प्रतिक होते. देशातील सर्व नद्या आणि दोन्ही समुद्र जेथे मिळतात त्या धनुष्यकोडी येथे त्यांचा जन्म झाला. त्यामुळेही असेल कदाचित. परंतु, देशातील सर्व तीर्थांचा सार त्यांच्या जीवनात आणि चरित्रात दिसून येतो. ते संगित प्रेमी, वीणा वादक, कवी, शास्त्रज्ञ, लेखक होते. ते प्रतिभावंत द्रष्टा नेते होते. त्यांचे इंग्रजी इतके सहज सोपे होते की, साधारणपणे इंग्रजी न येणाऱ्या माणसाला देखील त्यांचे भाषण सहज कळत असे. ते सुभाषितांसारखे बोलत असत. स्वप्ने खरी होतात, म्हणून स्वप्ने पाहिली पाहिजेत. संकटांचा सामना केलाच पाहिजे. कारण, त्याशिवाय यश मिळणार नाही. अडचणींवर स्वार व्हायला शिका, अडचणींना स्वार होऊ देऊ नका. मुलांनी प्रश्न विचारले पाहिजेत. विद्यार्थ्यांचा सर्वोत्तम गुण प्रश्न विचारणे हाच आहे. मोठ्यांना मात्र ते सांगत असत की, आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी आपला आजचा दिवस कुर्बान करा. ते आवर्जून सांगत होते की, भारताने जागाच्या पाठीवर मोठ्या देशांच्या बरोबरीने उभे राहिले पाहिजे.

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

त्या शिवाय या देशाला सन्मान मिळणार नाही, कारण शक्ती संपादन केल्याशिवाय या जगात कोणी सन्मान देत नाही. भारताला शक्तीमान व बलसागर करण्याचे ध्येय ऊराशी बाळगून ते आयुष्यभर काम करीत होते. 20-20 च्या खेळात रमलेल्या तरुणाला त्यांनी 2020 मध्ये बलसागर भारत करण्याचे स्वप्न दाखविले होते. आता यासाठी फक्त पाच वर्षे राहिली आहेत, मिसाईल मॅन आपल्या सोबत नाहीत. त्यांनी निर्माण केलेली ऊर्जा, त्यांनी दिलेली प्रेरणा, त्यांनी शिकविलेला वेग आणि अविरत मेहनतीची दिलेली दिशा आपल्या सोबत आहे. क्षेपणास्त्राची ताकद असलेला मंत्र मागे ठेऊन डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आपणातून निघून गेले आहेत. 2020 चे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, या देशाच्या महान सुपूत्राला व महान रत्नाला मी अखेरचा सलाम करतो.

सभापती महोदय, श्री.रा.सू.गवई यांच्या आंबेडकरी चळवळीच्या सहभागामुळे त्यांचा व्यक्तीगत स्नेह मी अनुभवला आहे, या सभागृहाचे सभापती, सदनाचे ज्येष्ठ सदस्य, विरोधी पक्ष नेते म्हणून त्यांचे काम मी गॅलरीतून अनेक वेळा पाहिले आहे, हा माणूस अत्यंत ग्रेट होता. डॉ.बाबासाहेबांच्या विचारांनी या राज्याला अनेक प्रतिभावंत, कलावंत, लेखक, कवी, विचारवंत व नेते देखील दिले आहेत, डॉ.बाबासाहेब त्या सर्वांमध्ये अग्रणी होते. श्री.रा.सू.गवई बिहार राज्याचे राज्यपाल असताना आम्हा सर्वांना त्यांनी आर्वजून बोलविले होते. आम्ही सर्व बिहार येथे गेलो होते. राजभवनावर आम्हाला कधी राहता येईल काय, याबाबत आम्हाला मुंबईतील राजभवनाचे फार कौतुक वाटत होते. बिहार येथील राजभवनात त्यांनी आम्हाला दोन दिवस ठेवले होते. त्यांच्या सोबत घालविलेले क्षण कधीही विसरता येणार नाही.

सभापती महोदय, मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर चळवळीतील रा.सू.गवई यांचे काम अतुलनीय होते. मंडल आयोगाच्या चळवळीच्या वेळी ते दिवसरात्र गावागावात आमच्यासोबत फिरत होते. मुंबईत मंडल आयोगाच्या समर्थनार्थ पहिली परिषद झाली त्या परिषदेसाठी रा.सू.गवई, एस.एम.जोशी, प्रमोद महाजन, अहिल्याताई रांगणेकर उपस्थित होत्या, या सर्व मंडळींना त्यांनी एकत्र केले होते. देशात मंडल आयोगाची अंमलबजावणी झाली पाहिजे, असा पहिला आवाज पोद्यार कॉलेजच्या सभागृहात त्यांनी उठविला होता. महात्मा फुले यांची बदनामी करण्याचा प्रयत्न

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

बाळगंगा यांनी केला तेव्हा प्रचंड मोठा मोर्चा मुंबईत काढण्यात आला होता. त्या मोर्च्याचे नेतृत्व रा.सू.गवई यांनी केले होते, त्यांच्याकडे संघटन कौशल्य होते.

सभापती महोदय, दीक्षाभूमीबाबत मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे, त्यामुळे त्याबाबत मला बोलण्याची गरज नाही. डॉ. बाबासाहेबांचे उचित विचारांचे स्मारक करण्याची कल्पकता व प्रतिभा त्यांच्याकडेच होती, ती अभावानेच दुसरीकडे आढळते, ते रसिक व कलासक्त होते, कोणत्याही क्षणी ते अगदी सहजतेने बोलत होते, उगाच ओढून घेतलेले गांभीर्य त्यांच्याकडे नसे. एखादा गंभीर विषय ते हलक्या फुलक्या शब्दांनी हाताळीत होते, ती त्यांची विलक्षण हातोटी होती. दादासाहेबांचे चळवळीतील, आंबेडकरी चळवळीतील व महाराष्ट्रातील संसदीय प्रथा परंपरेचे योगदान अभूतपूर्व आहे, मी त्यांना अखेरचा जयभीम करतो. या दोन्ही महान सुपूत्रांना पुरोगामी गटाच्यावतीने माझ्यावतीने व लोकभारती पक्षाच्यावतीने श्रध्दांजली अर्पण करतो व माझे भाषण संपवितो.

------

**सभापती** : गट नेत्यांचे विचार मांडून झाले आहेत, परंतु माझ्याकडे काही सन्माननीय सदस्यांनी विनंती केली आहे. अत्यंत थोर व्यक्तिमत्वाच्या निधनानिमित्त त्यांना त्यांचे विचार मांडावयाचे आहेत, अपवाद म्हणून प्रत्येकाने पाच पाच मिनिटेच बोलावे अशी मी विनंती करतो. आता माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई यांनी विचार मांडावेत.

-------

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपणाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, भारताचे माजी राष्ट्रपती यांचे दु:खद निधन झाले आहे. प्रत्येकाला खरोखर आपल्या जवळचा कोणी तरी माणूस किंवा मार्गदर्शक निघून गेल्यासारखे वाटत आहे. ही माणसे इतकी मोठी कशी होतात, मोठी माणसे आणि मोठी पदे यांचा मेळ नेहमीच बसतो असे नाही. राष्ट्रपती पदी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम या मोठ्या व्यक्तीची निवड झाल्याबाबत भारतीयांना मोठा अभिमान वाटला होता. त्यांनी देशाला दिशा देण्याचे खरोखर आगळे वेगळे काम केले आहे. त्यांच्याबाबत मला आलेला अनुभव मी सांगणार आहे, दैनिक सामनाच्या प्रकाशन व प्रबोधन संस्थेतर्फे तरुणांसाठी एक कार्यक्रम करायचे ठरविण्यात आले होते. शिवाजीपार्क येथे 'करिअर फेअर' किंवा तरुणांना पदवीनंतर कोणते वेगवेगळे मार्ग आहेत याबाबत प्रदर्शन व एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. माननीय बाळासाहेब ठाकरे या संस्थेचे प्रमुख होते. त्यांना मी उद्घाटन कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यासाठी गेलो तेव्हा ते मला म्हणाले की, मला कशाला बोलविता मी तर आपलाच आहे, राष्ट्रपतींना बोलवा. असा त्यांनी आदेश दिल्यानंतर मी दिल्लीला गेलो माझ्या सोबत माननीय श्री.सुरेश प्रभू होते. आम्ही दोघांनी या कार्यक्रमाचे राष्ट्रपतींना निमंत्रण दिले त्यांनी कोणतेही आढेवेढे न घेता आमचे निमंत्रण स्वीकारले.

सभापती महोदय, ते असे म्हणाले होते की, विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम असल्यामुळे मी जरुर येतो, त्यांनी तारीख देखील बदलली नाही. त्यांच्या सोईप्रमाणे तारीख बदलण्याची आमची तयारी होती. त्यांनी असे सांगितले की, मी येऊन फीत कापण्यात मला फारसे स्वारस्य नाही. तुम्ही त्या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांना बोलवा मला त्यांच्याशी बोलावयाचे आहे. त्यांचे अधिकारी व आमची बैठक झाल्यानंतर आमचा कार्यक्रम ठरला. त्या कार्यक्रमाला डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आले होते. जवळपास 500 मुलांशी त्यांनी गप्पा मारल्या होत्या. त्यांनी मुलांना विज्ञान व पदार्थ विज्ञान शास्त्रावर प्रश्न विचारले होते. त्यावेळी तेथे अनेक प्रश्नोत्तरे झाली होती, त्यांनी भाषण केले नाही, शेवटी त्यांनी मुलांना एक गोष्ट सांगितली.

सभापती महोदय, मला असे वाटते की, ती गोष्ट फक्त विद्यार्थ्यांसाठीच नाही तर सर्वांसाठीच महत्वाची आहे. अग्नीपंख हे पुस्तक त्यांनी लिहिले आहे, त्यात ही गोष्ट लिहिली आहे.

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष देसाई...

त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, भारताने क्षेपणास्त्र बनविण्याचे ठरविले त्यावेळी सुरुवातीचा काळ होता. सर्व मोहीम तयार झाल्यावर क्षेपणास्त्र उडविण्याची वेळ आली तेव्हा सर्व मोठे नेते तेथे आले होते. संपूर्ण जगात त्या गोष्टीची कल्पना होती. मिडियाचे लोक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. उलटी गिनती सुरु झाल्यानंतर अग्नीबाण उडविण्यात आला, तो अग्नीबाण थोडासा वर गेला आणि कोसळला. ते मिशन फेल झाले, त्यावेळी साहजिकच सर्व नाराज झाले व सर्वांना धक्का बसला होता.

सभापती महोदय, त्या मिशनचे प्रमुख श्री.सतिश धवन होते, पत्रकारांनी त्यांना विचारले की, हे अपयश कसे काय आले, याला कोण जबाबदार आहे. इतकी मोठी तयारी व इतका मोठा खर्च केला तरी देखील अपयश आले, त्यावेळी सतिश धवन यांनी असे सांगितले होते की, या सर्व मिशनचा मी प्रमुख आहे, त्यामुळे या अपयशाला मी जबाबदार आहे. त्यावेळी शासनाने सांगितले की, या मोहीमेची पुन्हा तयारी करा. काही वर्षानंतर भारताचा अग्निबाण उडविण्यास सज्ज झाला व तो यशस्वीपणे आकाशात सोडण्यात आला होता. त्यावेळी देखील त्या मिशनचे प्रमुख सतिश धवन होते, सरकारने त्यांना बदलले नव्हते. पत्रकारांनी त्यांचे अभिनंदन केले, त्यावेळी सतिश धवन शांतपणे म्हणाले की, हे यश माझे नाही, हे यश माझ्या टीमचे आहे. हा किस्सा सांगून डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी मुलांच्या मनावर असे बिंबविले की, अपयश दुसऱ्याच्या गळ्यात मारण्याचे प्रकार होतात. यशाचा धनी मात्र मीच आहे, असे करणे बरोबर नाही. हा शास्त्रज्ञ विज्ञानात मोठा होता, त्यांनी सतिश धवन यांना सर्व श्रेय दिले होते. खरे तर हे श्रेय त्यांना स्वतःला घेता आले असते. परंतु सतिश धवन यांनी अपयश आले तेव्हा मी स्वतः जबाबदार आहे असे सांगितले आणि यश आले तेव्हा हे यश माझ्या टीमचे आहे असे सांगितले होते. एका छोट्या किस्स्यातून त्यांनी फार मोठा संदेश दिला आहे. त्यामुळे तेथील वातावरणात चैतन्य निर्माण झाले होते. आमचा कार्यक्रम यशस्वी झाला होता. अशा प्रकारे जमिनीवर अत्यंत घट्ट पाय रोवलेले डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना खरोखर वंदन करावे अशी ती व्यक्ती होती.

सभापती महोदय, रा.सू.गवई यांच्या बाबतीत मी एक अनुभव सांगतो, विधानपरिषदेमध्ये माननीय श्री.मनोहर जोशी सदस्य म्हणून काम करीत असताना त्यांच्याकडे मी एक प्रश्न दिला

....5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष देसाई...

होता. माझ्या गोरेगांव मतदारसंघातील सिध्दार्थनगर वसाहतीत टोपलीचे संडास होते. महाराष्ट्राच्या राजधानीत टोपलीचे संडास असलेली म्हाडाची वसाहत होती. हा विषय श्री.मनोहर जोशी यांनी अत्यंत प्रभावीपणे सभागृहात मांडला होता. त्यावेळी रा.सू.गवई यांनी त्याक्षणी निर्णय घेतला की, उद्या या वसाहतीला भेट द्यावयाची आहे. आता ही बाब सहन करावयाची नाही. त्यानंतर लगेच गृहनिर्माण मंत्री व अधिकारी असे सर्व त्या वसाहतीत गेले होते. शासनाला ताबडतोब निर्णय घ्यावा लागला की, टोपलीचे सर्व संडास पाडून त्या वसाहतीमध्ये पक्की शौचालये बांधण्यात यावीत. अशा प्रकारे जनतेचे दु:ख व अडचण काय आहे, यावर विचार करीत न बसता प्रत्यक्ष कृती करणारे असे रा.सू.गवई आम्हाला त्यावेळी दिसले होते.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष देसाई.....

म्हणून हा माणूस इतकी उंची गाठू शकला आणि लोकांच्या मनामध्ये त्यांच्याबद्दलचा आदर निर्माण झाला. सगळे पक्षभेद किंवा कोणतेही वैचारिक भेद असले तरी ते पार करुन डॉ.कलाम किंवा रा.सू.गवई यांच्याबद्दल आपल्या सर्वांच्या मनात नितांत आदर आहे आणि तो कायमच राहील. मी या दोन्ही थोर व्यक्तींना आदरांजली वाहतो.

--------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आणि स्व.रा.सू.गवई यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर बोलण्याची आपण मला संधी दिली त्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, 300 सेकंद एवढ्या मर्यादित वेळेत दोन्ही महापुरुषांबद्दल मला बोलता येणार नाही, ही माझी खंत आहे. सभागृहात अनेक सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्याबद्दल बोलण्याची संधी या निमित्ताने घेतो. "विंग्ज ऑफ फायर" हे त्यांचे गाजलेले पुस्तक आहे. प्रत्येक भारतीयाला पंख मिळावेत आणि ते अग्निचे असावेत, अग्निपंख घेऊन तुम्ही जेव्हा भरारी माराल त्यावेळेला या देशाला या नभांगणात अभेद्य असे चिरकाल टिकणारे स्थान मिळवून देऊ शकाल अशी प्रचंड विज्ञाननिष्ठा असलेला एक थोर भारतीय संशोधक, वैज्ञानिक, एक अतिशय चांगला माणूस या पृथ्वीतलावरुन आपल्याला सोडून गेला आहे. ही एका समर्पित जीवनाची अखेर आहे असे मला सतत वाटते. त्यांना त्यांच्या आयुष्यात मिळालेला मानसन्मान, राष्ट्रपती पदापर्यंत जाण्याची त्यांच्या अंगी असलेली मूलभूत शक्ती, या सर्वाच्या पलीकडे या थोर वैज्ञानिकाला कायम एक प्रश्न सतावत असे असे माझ्या मनात नेहमी येते. विज्ञानाची इतकी कास धरल्यानंतर शेवटी हे सगळे आपण संहारासाठी की मानवी विकासासाठी करतो? हा एक मूलभूत प्रश्न गेल्या काही शतकापासून या जगाला पडलेला आहे. आपल्या सगळयांना माहीत असेल की, जगातील साहित्यातील सगळ्यात गाजलेली कादंबरी 'वॉर ॲण्ड पीस' ही आहे. युध्द होत राहतील, मानवी संहार होत राहतील. परंतु या सगळ्यांना थांबवायचे असेल तर नवीन क्षेपणास्त्र, नवी संहारके निर्माण करीत असताना विज्ञानाचा उपयोग माणसाच्या विकासासाठी, माणुसकीसाठी कसा करता येईल हा ध्यास त्यांना कायम लागलेला असावा असे मला वाटते.

सभापती महोदय, गुरुकूल पध्दतीचे शिक्षण घेण्याची देशातील हजारो वर्षांची परंपरा आहे. मला वाटते, भारतीय विज्ञानामधील आद्य गुरुकुलाचे प्रमुख कुलगुरु म्हणून ते आपल्या सगळया भारतीयांच्या मनात कायमच राहतील. एक निश्चित आहे की, त्यांनी जी जी पुस्तके लिहिली, जी गाजलेली पुस्तके म्हणून आपल्यासमोर येतात, त्यात "India 2020, Wings of Fire, Ignited

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

Minds, Guiding Souls, Target 3 billions, Turning Point, My Journey- Transforming Dreams into action, The Scientific India" यांचा समावेश होतो. खरे म्हणजे साहित्य ही फॅक्ट आणि फिक्शन या दोन्हीची काही प्रमाणात मिसळ असते. जेथे फॅक्ट प्रखर असते आणि ज्याला फिक्शनची जोड द्यावी लागत नाही अशा प्रकारचे साहित्य एका वैज्ञानिकाने निर्माण करणे ही फार मोठी अजब गोष्ट आहे असे मला नेहमी वाटते.

सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार या देशाचे संरक्षण मंत्री होते त्याच काळात डॉ.कलाम डीआरडीओचे प्रमुख होते. तेव्हापासूनच त्यांनी कायम मैत्री जपली होती. दोधांच्या आवडीचे विषय किंवा दोघांच्या चर्चेचे विषय संरक्षण खात्याबद्दल असतीलच, पण इतरही अनेक विषयांमध्ये ही माणसे तितकीच कलासक्त होती. एकदा त्यांना श्री.शरद पवार साहेबांनी विचारले होते की, तुम्ही अहोरात्र काम करीत असता, कित्येक वेळेला प्रयोगशाळेमध्ये तुम्ही झोपता, हे सगळे करताना तुमचे जेवणाकडे व प्रकृतीकडे लक्ष नसते, अशा वेळेला तुम्ही विरंगुळा म्हणून काय करता? त्यांचे उत्तर असे होते की, मी त्यावेळेला पंडित भीमसेन जोशी यांची गाणी ऐकतो. हे जे अंतरंग आहेत ते अशा खुल्या पध्दतीने आपण सगळयांना सांगावे, मला जाणू काही तरी सांगायचे आहे हे अखेरच्या क्षणापर्यंत स्वत:मधील उर्मी न हरवलेला हा भारताचा एक सर्वोत्कृष्ट निरंतर असा ऊर्जास्त्रोत होता. म्हणून त्यांचे महत्व खूप मोठे आहे.

सभापती महोदय, बाबा आमटे यांच्याबद्दल कविता लिहिताना कुसुमाग्रजांनी असे लिहिले होते की, असेच एकटा चालत राहिलो वादळ वारे घेऊन खांद्यावर साथ सोबत हवी आहे कोणाला, माझीच धरती, माझेच आकाश. स्वत:ला या धरती आणि आकाशाशी जोडणारा माणूस फार दुर्मीळ असतो. फार आदराने तो जपावा लागतो. कारण त्यांनी जे काही आपल्याला दिले ते आपल्या पुढील पिढीच्या दृष्टीने महत्वाचे असते.

एक प्रश्न सर्वसामान्य माणसांना थोरामोठयांना पडलेला असतो. आपली परिस्थिती कशी असते, काय असते, त्यावर आपण कशी मात करु शकतो. सांगा कसे जगायचे? या प्रश्नाचे उत्तर एका शब्दात सांगायचे झाले तर डॉ.कलाम यांच्यासारखे जगायचे. काहीतरी मी सातत्याने देत राहीन. सगळयांशी नाते असणारा, प्रत्येकाला आपला वाटणारा असा एक माणूस म्हणजे डॉ.कलाम होते. जे नाते त्यांनी भारतीयांशी जोडले, त्या नात्याला एक अतिशय वेगळे आयाम या

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले.....

निमित्ताने प्राप्त झाले होते. गालिबचा एक शेर आहे. त्याचे सुंदर भाषांतर मराठीत केलेले आहे. नात्यास अपुल्या देऊ नकोस नाव काही, साऱ्याच चांदण्यांची जगतास जाण आहे. दारातल्या पथ दिपांना पथ का पुसावा, मंजील ही पथांची तारांगणात नाही. असा हा तारांगणात अढळ स्थान प्राप्त झालेला एक भारतीय माणूस आहे. शेवटच्या क्षणापर्यंत विद्यार्थ्यांबरोबर राहिलेला, आणि शिक्षक म्हणूनच आपल्या आठवणी मागे ठेवून गेलेला काम सुरु ठेवले.

सभापती महोदय, चालतो मी सारखा हा चालण्याला अंत नाही, चाललो कोठे आता हीही आता खंत नाही. एक समर्पित आयुष्य आज संपलेले, मावळलेले आपण या ठिकाणी पहात आहोत. प्रत्येक भारतीयाच्या मनात अग्निपंखाच्या निमित्ताने एक ज्योत कायम तेजस्वीपणे जळत राहील आणि नव्या विज्ञानाचा मार्ग दाखवित राहील याबद्दल मला भारतीय नागरिक म्हणून विश्वास वाटतो.

सभापती महोदय, आदरणीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी डॉ.कलाम यांचा जन्मदिवस विज्ञान दिवस म्हणून साजरा करावा अशी शासनाला विनंती केली आहे. विज्ञान दिवस साजरा करण्याबरोबरच विज्ञानाचा प्रसार करण्यासाठी एक मिशन सुरु करावे, ज्यामुळे समाजातील अंधश्रध्दा नष्ट होतील, समाजाला चांगली दिशा मिळेल. अशा प्रकारचे काम डॉ.कलाम यांच्या नावाने राज्यात उभे करु शकलो तर मला वाटते आपल्या सगळ्यांमध्ये थोडे थोडे कलाम जिवंत राहतील.

नंतर के.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले...

या सदनाचे माजी सभापती श्री.रा.सु.गवई यांच्याबद्दल अनेक वक्ते बोलणार आहेत. समाज रचनेमध्ये परिवर्तन करणारे आणि विज्ञानाधिष्ठित समाज निर्मितीचे ध्येय असणारे हे दोन महामानव आज आपल्यातून निघून जाणे हे खरेच मनाला कुठे तरी वेदना देणारे आहे. पण त्यातून खूप शिकायचे असते. पुढे जायचे असते. यासाठीच या सभागृहात त्यांच्या निधनाबद्दल भावना व्यक्त करीत असतो. मला बोलायला दिले धन्यवाद. नमस्कार.

.....

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद. सभागृहाचे सन्माननीय नेते आणि राज्याचे मुख्यमंत्री यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्यास सन्माननीय विरोधी पक्ष नेते व अन्य पक्षाच्या नेत्यांनी जो पाठिंबा व्यक्त केला आहे, त्यावर अगदी थोडक्यात मी माझे विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे काल निधन झाले. काल टी.व्ही.वर डॉ.माशेलकर यांनी सांगितले की, भारताचा एक युग पुरूष हा काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांनी युग पुरूष हा शब्द वापरला आहे. तो अतिशय रास्त आहे. याचे कारण भारत हा एक विकसनशील देश आहे. भारत हा जगातील महासत्ता व्हावी असे ज्यांना ज्यांना वाटते त्या सर्व भारतीयांचे एक प्रतीक डॉ.कलाम साहेब होते. जगात एखाद्या देशाला महासत्ता व्हायचे असेल तर त्या देशाला तीन बेसिक गोष्टींची पूर्तता करावी लागते. एक म्हणजे आर्थिक क्षमता असली पाहिजे. दुसरे म्हणजे विकास झाला पाहिजे आणि तिसरी गोष्ट न्युक्लिअर पॉवर पाहिजे. या तीन बेसिक गोष्टींपैकी न्युक्लिअर पॉवर देण्याचे, न्युक्लिअर पॉवरने समर्थ देश करण्याचे मोठे काम कोणी केले असेल तर ते डॉ.कलाम साहेबांनी केले आहे, याचा मी येथे आवर्जून उल्लेख करतो. आपल्या लोकशाहीचे देखील कौतुक केले पाहिजे. एका सर्वसामान्य घरातील मनुष्य, सर्व सामान्य माणूस या देशाचा राष्ट्रपती होऊ शकतो, याचाही मी येथे आवर्जून उल्लेख करू इच्छितो.

सभापती महोदय, दिवंगत दादासाहेब ऊर्फ रा.सू.गवई यांच्याबद्दलही येथे अनेकांनी भावना व्यक्त केल्या आहेत. माझा आणि त्यांचा अनेक वर्षाचा परिचय, संबंध होता. आमचा एकमेकांमध्ये नेहमी संपर्क असायचा. मी आपल्याला सांगू इच्छितो की, राज सत्तेच्या माध्यमातून समाज परिवर्तन करू शकणारी अशी काही मोजकीच माणसे आपल्याला पहायला मिळतात. त्यामध्ये श्री.दादासाहेब गवई यांचा वरचा क्रमांक आहे. श्री.दादासाहेब गवई यांच्यावर भगवान गौतम बौद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, राजर्षि शाहू महाराज इत्यादी महान नेत्यांचा, त्यांच्या विचारांचा पगडा होता. ते त्यांच्या दृष्टीने प्रेरणास्थान होते. दलितांना, गरिबांना, उपेक्षितांना मदत

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

करणारा, चांगल्या कामात अडथळा न आणणारा, सर्वांना मदत करणारा, संपर्कात येणाऱ्या व्यक्तींच्या उणिवांकडे दुर्लक्ष करून चांगले गुण आत्मसात करणारा, विचारांची व्यापकता असणारा नेता आज आपल्यातून गेला आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, श्री.दादासाहेब हे एक मुरब्बी राजकारणी होते. ते व्यवहारी राजकारणी होते. त्यांच्या जाण्याने आपले अतोनात नुकसान झाले आहे.

सभापती महोदय, श्री.दादासाहेबांबद्दली एक गोष्ट मी आपल्याला सांगू इच्छितो. ते मृदू होते. त्यांचा चेहरा हसरा होता. पण ते धाडसी देखील होते. संसदेवर ज्यावेळी अतिरेकी हल्ला झाला त्यावेळी श्री.दादासाहेब गवई खासदार होते. श्री.कवाडे साहेब आणि श्री.प्रकाश आंबेडकर साहेब देखील खासदार होते. संसदेवर हल्ला झाला त्यावेळी सगळे लोक सैरावैरा पळाले. श्री.दादासाहेब गवई त्यावेळी सेंट्रल हॉलमध्ये बसून होते. सेंट्रल हॉलचे दरवाजे बंद करण्यात आले. लोक इकडे तिकडे पळायला लागले. श्री.दादासाहेब गवई उभे राहिले आणि सगळ्या खासदार आणि मंत्र्यांना म्हणाले की, आपणच जर भ्यायला लागलो तर देश आपल्याला काय म्हणेल ? काय व्हायचे ते इथेच होईल. आपण इथेच बसून राहिले पाहिजे. श्री.दादासाहेबांची ही आठवण कोणीच विसरू शकणार नाही.

सभापती महोदय, श्री.दादासाहेब गवई यांच्याबद्दल भावना व्यक्त करताना चळवळी, घटना यांचा उल्लेख करण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील साहेबांनी मंडल आयोगाचा उल्लेख केला आहे. मंडल आयोगासंबंधी त्यांचा फार मोठा सहभाग होता. नामांतराच्या चळवळीतही त्यांचा मोठा सहभाग होता. मी त्यांची सर्वांना प्रत्यक्ष घेऊन जाण्याची कार्यपद्धती रिडल्सचा प्रश्न ज्या वेळी आला त्या वेळी अनुभवली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले लेखन राज्य सरकारने प्रसिद्ध केले आणि रिडल्सचा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी श्री.शंकरराव चव्हाण हे राज्याचे मुख्यमंत्री होते. नागपूरला अधिवेशन सुरू होते. संपूर्ण महाराष्ट्र पेटला होता.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे...

अशा वेळी त्या रिडल्समधून बाहेर कसे पडायचे आणि समाजामध्ये समता कशी निर्माण करायची याचा तोडगा ज्यावेळी निघाला त्यावेळी श्री.शंकरराव चव्हाण साहेब होते, श्री.दादासाहेब गवई होते, मी होतो, श्री.प्रकाश आंबेडकर होते, विविध पक्षांचे अनेक नेते होते. त्यांनी जो मार्ग काढला त्यातून रिडल्सचा प्रश्न सुटला हे ही मी येथे आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, दीक्षा भूमी सुद्धा एक चळवळ म्हणून श्री.दादासाहेबांनी निर्माण केली. सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आताच येथे दीक्षा भूमीचे वर्णन केले आहे. त्यामुळे मी त्याबद्दल अधिक काही सांगू इच्छित नाही. पण मला अतिशय नम्रपणाने सांगावेसे वाटते की, श्री.दादासाहेबांना त्यांच्या जीवनामध्ये एक खंत होती. ती खंत अशी होती की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन निर्माण केले. त्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचा नंतर रिपब्लीकन पक्ष झाला. डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांच्या नंतर एन.शिवराज रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष झाले. त्यानंतर कर्मवीर श्री.दादासाहेब गायकवाड अध्यक्ष झाले. तेव्हा अखंड रिपब्लिकन पक्ष होता. श्री.दादासाहेब गायकवाड यांच्यानंतर रिपब्लिकन पक्षाची शकले झाली. ही शकले एकत्र येऊन अखंड रिपब्लिकन पक्ष व्हावा हे त्यांचे स्वप्न त्यांच्या हयातीमध्ये पूर्ण झाले नाही. ते स्वप्न रिपब्लिकन नेत्यांनी पूर्ण करावे अशी मी सर्व रिपब्लिकन नेत्यांना विनंती करतो.

सभापती महोदय,मी येथे एक पुण्याचा किस्सा सांगतो. 1970 मध्ये आम्ही पुणे महानगरपालिकेच्या प्रांगणात महात्मा जोतिबा फुले यांचा पुतळा उभा केला. त्यानंतर महात्मा फुले स्मारक समिती झाली. त्यावेळी आम्ही सगळे स्मारक समितीचे अध्यक्ष श्री.गवई साहेबांना भेटायला गेलो आणि आज महात्मा फुले यांचा दिमाखदार पुतळा विधान भवनाच्या प्रांगणात आहे. त्याचे संपूर्ण श्रेय श्री.दादासाहेब गवई यांना जाते, एवढेच या प्रसंगी मी आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मी या दोन्ही महनीय नेत्यांना भावपूर्ण श्रद्धाजली अर्पण करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली याबद्दल आपले आभार व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

.......

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्म दिन "अवकाश विज्ञान दिन" म्हणून घोषित करणे**

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्म दिन विज्ञान दिन म्हणून शासनाने जाहीर करावा अशा प्रकारची भावना येथे व्यक्त करण्यात आली आहे. आपल्या देशामध्ये आपण 28 फेब्रुवारी हा दिन विज्ञान दिन म्हणून साजरा करतो. त्यामुळे डॉ.कलाम यांचा जन्म दिन "अवकाश विज्ञान दिन" म्हणून शासनाने घोषित करावा अशी मला येथे सुधारणा करावयाची आहे. कारण त्यांनी आयुष्यभर अवकाशात उपग्रह सोडण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत.

.....

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, राज्याच्या सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जो शोक प्रस्ताव सादर केला आहे त्या संदर्भात सहवेदना व्यक्त करण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

देशाचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम साहेबांच्या निधनाबद्दल सन्माननीय मुख्यमंत्र्यासहित, सन्माननीय सभागृहाने देखील आपली शोक सहवेदना व्यक्त केली आहे.

सभापती महोदय, सामान्य माणूस असामान्य कसा होऊ शकतो याचे जीते-जागते उदाहरण म्हणजे डॉ.कलाम साहेबांचे देता येईल. असे म्हटले जाते की, "The Great people born in adverse zone, not in comfort zone."

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

डॉ.एपीजे अब्दुल कलाम साहेबांचे जीवन गरिबी आणि खडतरतेमध्ये गेले. लोक गरिबी आणि अडचणी चिवडत बसतात परंतु डॉ.एपीजे अब्दुल कलाम साहेबांनी या सर्वसंकटावर मात करुन आपल्या जीवनाची वाटचाल केली आणि आपल्या देशाला शास्त्रीय क्षेत्रामध्ये एका उंचीवर नेऊन ठेवले असून याकडे आपल्या देशातील तरुणाईने किंवा देशातील वैफल्यग्रस्त जनतेने लक्ष दिले तर निश्चितपणे आपल्या देशाला फायदा होऊ शकेल. डॉ.एपीजे अब्दुल कलाम साहेबांची मिसाईल मॅन म्हणून, अणुशास्त्रज्ञ म्हणून जगाला ओळख आहे. आपल्या देशाच्या शैक्षणिक, वैज्ञानिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये डॉ.एपीजे अब्दुल कलाम साहेबांचे अनमोल असे योगदारन आहे. ते कोणत्याही पदावर असले तरी ते नेहमीच शिक्षकांच्याच भूमिकेत राहिले. काल त्यांचे निधन झाले तेव्हा ते शिलाँग येथे आयआयएमच्या विद्यार्थ्यांना व्याख्यान देत होते. व्याख्यान देत असतानाच ते कोसळले आणि आपल्याला सोडून गेले. ज्ञान,विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांचे योगदान आम्ही कधीही विसरु शकत नाही. ते एक उत्कृष्ठ असे लेखक होते. ते केवळ लिहिण्यासाठी लिहीत नव्हते तर देशाला प्रेरणा देण्यासाठी ते लिहीत होते. त्यानी लिहलेली पुस्तके "Wings of Fire, Inspiring Thought, You are born to blossom, Take my journey beyond, Ignited Minds unleasing power within India, आपला देश महासत्ता व्हावा असे स्वप्न त्यांनी पाहिले होते. A Manifesto for change a sequel to India या नावाचा ग्रंथ त्यांनी लिहिला. विंग ऑफ फायरच्या संदर्भात असे म्हटले जाते की, मंजिलें उनको मिलती हैं जिनके सपनों में जान होती है, उड़ान पंखों से नहीं, हिम्मत और हौंसलों से होती है. हौसलेचे पंख ज्या शास्त्रज्ञाने दिले त्या शास्त्रज्ञाचे नाव आहे डॉ.एपीजे अब्दुल कलाम. आपला देश विज्ञानाधिष्टीत व्हावा व आपल्या देशातील अंधश्रध्दा, कर्मकांड आपल्या देशातून आणि समाजातून बाहेर पडावी व आपला देश समतेच्या बंधुत्वतेच्या, न्यायाच्या, स्वातंत्र्यमुक्तीच्या प्रवाहात यावा असे त्यांचे स्वप्न होते व ते स्वप्न त्यांनी साकार करण्याचा प्रयत्न आटोकाट केला. डॉ.एपीजे अब्दुल कलाम साहेबांनी पीएसएलव्ही,एसएलव्ही-3 ची मोहीम फार यशस्वीतेने पार पाडल्या. 1974 मध्ये माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कालखंडात पोखरण येथे जो पहिला अणुस्फोट झाला होता त्या मिशनला "स्माईलिंग बुध्दा" असे नाव होते व 1998 मध्ये माजी पंतप्रधान वाजपेयी

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

यांच्या कालखंडात पोखरण येथे दुसऱ्यांदा जी अणु चाचणी करण्यात आली होती त्या मिशनला "बुध्दा स्माईल" असे नाव होते. त्यावेळेस आम्ही लोकसभेमध्ये होतो. अणुस्फोट आणि बुध्दाचा संबंध काय या कारणाने आम्ही सभागृहात गोंधळ घातला होता. परंतु शास्त्रज्ञ म्हणून कलाम साहेबांचा अणुशक्तीकडे,अणुऊर्जेकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा शांततेसाठी अणुशक्तीचा वापर यासाठी होता. युध्दाचा आणि बुध्दाचा फार जवळचा संबंध आहे. बुध्दाने युध्दच करण्यास शिकवले आहे. बुध्दाने सर्व प्रकारच्या वाईट प्रवृत्तीविषयी युध्द करण्यास शिकवले आहे. अशा प्रकारे अणुस्फोटाच्या मोहिमेचे समर्थन हे उध्वस्त करण्यासाठी नाही तर शांततेसाठी असून समाजाला, देशाला आणि जगाला आगाज करण्यासाठी अणुशक्तीचा वापर करण्यात आला.

सभापती महोदय, डॉ.कलाम साहेबांनी स्वतः गरिबी अनुभवली होती. त्यांचा Poverty anywhere is threat to prosperity anywhere या गोष्टीवर विश्वास होता. गरिबी कोठेही असली तरी ती संपन्नतेसाठी, समृध्दीसाठी धोकादायक असू शकते म्हणून आपला देश गरिबीमुक्त झाला पाहिजे, दारिद्रय मुक्त झाला पाहिजे, सर्वांना सुखासमाधानाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे असे त्यांचे स्वप्न होते. त्यामुळे त्यांनी आपल्या देशाला दारिद्रय मुक्त करण्याचा प्रयत्न केला होता. एक शास्त्रज्ञ जेव्हा देशाचा प्रमुख होतो तेव्हा संपूर्ण देश ज्ञान-विज्ञानावर वाटचाल करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले होते. त्यांचे विद्यार्थ्यांबरोबर असलेले संबंध फार चांगले होते. त्यांनी तरुणांना दिशा देण्याचे, प्रेरणा देण्याचे काम आयुष्यभर केले. डॉ.एपीजे अब्दुल कलाम हे कवी होते, शास्त्रज्ञ होते परंतु साहित्य, संगीत, अध्यात्माच्या क्षेत्रात त्यांचा गाढा व्यासंग होता हे आम्ही विसरु शकत नाही. डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या कवितेचा उल्लेख माननीय मुख्यमंत्री तसेच सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील व सन्माननीय सदस्य हेमंत टकले यांनी केलेला आहे. कवी मनाचा माणूस जेव्हा शास्त्रज्ञ होतो तेव्हा ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात माऊलीचे स्थान कसे असते, मायेची पाखरण कशी करावयाची असते हे आपल्याला डॉ.एपीजे अब्दुल कलाम साहेबांच्या माध्यमातून पहायला मिळाले आहे.

सभापती महोदय, डॉ.एपीजे अब्दुल कलाम साहेबांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अनेक पुरस्कार मिळाले होते. आपल्या देशाचा भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कारही त्यांना मिळाला होता व

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

ती आपल्या देशासाठी अत्यंत गौरवशाली बाब आहे. आपल्या देशाचे गौरव पुरुष, महान शास्त्रज्ञ, आपल्या देशाचे महान वैज्ञानिक डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या निधनाबद्दल मी माझ्या तर्फे तसेच माझ्या पिपल रिपब्लीकन पक्षातर्फे अखेरचा सलाम करतो.

सभापती महोदय, या सभागृहाचे माजी सभापती, बिहार आणि केरळचे माजी राज्यपाल श्री.रामकृष्ण सूर्यभान गवई उर्फ रासू गवई यांचे 25 जुलै, 2015 रोजी दु:खद निधन झाले. अनेक वक्त्यांनी माननीय गवई साहेबांच्या प्रती भावना व्यक्त केल्या आहेत. परंतु मी गवई साहेबांकडे राज्य घटनेचा भाष्यकार म्हणून बघतो. गवई साहेबांचे व्यक्तिमत्व हे अत्यंत मुत्सद्दी होते. रिपब्लीकन पक्षाच्या चळवळीमध्ये त्यांनी दिलेले योगदान ही केवळ रिपब्लीकन जनताच नव्हे तर महाराष्ट्रातील व देशातील जी जनता उपेक्षित,वंचित,दलित,आदिवासी,ओबीसी,अल्पसंख्यांक जनता आहे ती त्यांना कधीही विसरु शकणार नाही. माननीय गवईसाहेब या सभागृहाचे सभापती असताना सभागृहात जो तणाव निर्माण व्हायचा तेव्हा तो तणाव निवळण्याचे काम ते अत्यंत वेगळया पध्दतीने करीत असत. तणावाचे रुपांतर हास्यामध्ये करण्यात त्यांचा हातखंडा होता. माननीय गवई साहेब सभापती असताना आम्ही प्रेक्षक गॅलरीमध्ये बसलो होतो तेव्हा सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला होता. आम्ही नवीन असल्यामुळे सभागृहात आता मारामारी तर होणार नाही ना, असे वाटले होते. या तणावाचे रुपांतर त्यांनी अचानक हास्यामध्ये बदलून सभागृहात खेळीमेळीचे वातावरण निर्माण केले होते.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

मी नंतर त्यांच्या दालनात गेलो. त्यांना विचारले की, दादासाहेब, सभागृहात तणावाचे वातावरण होते, तोडफोड होते की काय असे वातावरण होते आणि आपण ते वातावरण एकदम सुरळीत कसे आणले ? त्यावर ते मला म्हणाले की, माझा पानाचा डबा शिपायाच्या हाती देऊन त्यांच्याकडे पाठवून दिला. त्यांनी पान खाल्ले आणि सभागृहातील वातावरण शांत झाले. अत्यंत नम्र विनोदी, प्रसन्न व्यक्तिमत्वाचे धनी, अनेक प्रकारचे ताणतणाव आपल्या पानाच्या डब्यातून सोडविणारे असे हे व्यक्तिमत्व होते.

सभापती महोदय, गवई साहेबांनी रिपब्लिकन पक्षासाठी केलेले काम कोणीही विसरु शकत नाही. कर्मवार दादासाहेब गायकवाड हे रिपब्लिकन पॉर्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष होते त्यांच्या नेतृत्वाखाली भूमीहिनांसाठी देशव्यापी सत्याग्रह झाला. गवई साहेबांनी या देशव्यापी सत्याग्रहमध्ये अमरावती आणि पश्चिम विदर्भाचे नेतृत्व केले. गवई साहेबांच्या नेतृत्वाखाली अमरावतीमध्ये प्रचंड असा ऐतिहासिक सत्याग्रह झाला. हजारो लोक तरुंगात गेले. तुरुंगात जागा नव्हती म्हणून अमरावती शहरातील अनेक मैदाने, शाळेची पटांगणे तुरुंगामध्ये परावर्तीत करण्यात येऊन त्या ठिकाणी आंदोलकांना ठेवण्यात आले. त्यावेळी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी "राहिल त्याचे घर, कसेल त्याची जमीन" अशी घोषणा दिली होती. पण गवईसाहेबांनी सांगितले की, राहिल त्याचे घर, कसेल त्याची जमीन, पण नसेल त्याचे काय ? असा त्यांनी उपेक्षितांसाठी प्रश्न विचारला. आम्ही त्यांचे हे काम कधीच विसरु शकणार नाही.

सभापती महोदय, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना झाली त्यावेळी श्री.शिवराज हे संस्थापक अध्यक्ष झाले.नंतर कर्मवीर दादासाहेब गायकवाड अध्यक्ष झाले.त्यानंतर श्री.रा.सू.गवईसाहेब अध्यक्ष झाले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने भूमीहिनांसाठी केलेले आंदोलन पाहून श्री.यशवंतराव चव्हाण यांनी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचेसोबत आघाडी केली. काँग्रेस आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची आघाडी झाली. सन 1964 मध्ये श्री.गवई साहेब विधानपरिषदेचे सदस्य झाले. त्यानंतर त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. 1963 ते 1984 पर्यंत ते विधानपरिषदेचे सदस्य होते. त्यानंतर सन 1998 मध्ये लोकसभेची निवडणूक झाली तेव्हा ते अमरावती मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी येथे सांगितले की, रिपब्लिकन पॉर्टी ऑफ इंडियाची शकली झाली, फाटाफूट झाली. पण त्याबाबत गवई साहेबांनी नेहमी सकारात्मक भूमिका घेतली. आम्ही त्यावेळी राजकारणात नव्हतो. आम्ही दलित मुक्ती सेनेच्या माध्यमातून सामाजिक चळवळ चालवित होतो. नामांतर आंदोलन असेल, रिडल्सचे आंदोलन असेल आम्ही दलित मुक्ती सेना या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून त्यांच्या सोबत आंदोलनात सहभागी होतो. त्यावेळी गवई साहेब राजकारणामध्ये होते.

सभापती महोदय, नामांतर होणार असेल तर ते नामांतर श्री.शरद पवार साहेब करु शकतील अन्य दुसरे कोणी करु शकणार नाही असे आम्ही त्यावेळी सांगितले होते. नामांतर करण्यासाठी श्री.गवई साहेबांनी श्री.शरद पवार साहेबांना कन्व्हीन्स केले. शेवटी दिनांक 14 जानेवारी 1994 रोजी मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे नाव देण्यात आले. हे नामांतर होण्यामध्ये अनेकांचा सहभाग होता पण श्री.गवई साहेबांचे फार मोठे योगदान होते.

सभापती महोदय, मा.श्री.अंतुले साहेब मुख्यमंत्री असताना नामांतराचे आंदोलन शिखरावर होते. त्या कालखंडामध्ये रायगड जिल्ह्यातील लोणेरे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठ स्थापन झाले. हे तंत्र विद्यापीठ स्थापन करण्यामध्ये देखील श्री.गवई साहेबांचा फार मोठा हात होता, हे मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, या देशातील 52 टक्के ओबीसी समाजाला आरक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे. राज्य घटनेच्या कलम 340 कलमान्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील बहुजन, ओबीसी समाजासाठी आरक्षणाची तरतूद करुन ठेवली होती. या देशातील 52 टक्के ओबीसी समाजाला आरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी आंदोलने झाली, परिषदा झाल्या, संमलने झाली, रस्त्यावर आंदोलने झाली, गल्लीपासून दिल्लीपर्यंत आंदोलने झाली, त्या आंदोलनामध्ये श्री.गवई साहेबांचा फार मोठा सहभाग होता, हे मला येथे सांगावेसे वाटते. त्यानंतर मंडल आयोग लागू झाला. महाराष्ट्र राज्यातही तो लागू झाला.

सभापती महोदय, गवई साहेबांनी पाली भाषेच्या विकासासाठी पाली भाषा प्रचार समितीची स्थापना केली होती.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

सभापती महोदय, गवई साहेब दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीचे जागतिक कीर्तीचे चिरंतर स्मारक गवई साहेबांच्या नेतृत्वाखाली तयार झाले, हे आम्ही विसरु शकत नाही.

सभापती महोदय, श्री.अरुण शौरी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची बदनामी करणारे "Worshipping False God" हे पुस्तक लिहिले. त्यावेळी गवईसाहेब राज्यसभेवर होते. अत्यंत शांत स्वभावाचे, संसदीय कार्यपद्धतीवर निष्ठा असणारे, संयमी नेते असलेले गवई साहेब यांनी अरुण शौरी यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर लिहिलेले पुस्तक वाचून ते बिथरले आणि त्यांनी राज्यसभेमध्ये श्री.अरुण शौरी यांचे ते पुस्तक टराटरा फाडले. डॉ.बाबासाहेबांनी राज्य घटना लिहिली. आम्ही गवई साहेबांना राज्य घटनेचा भाष्यकार म्हणतो. श्री.अरुण शौरी यांनी डॉ.बाबासाहेबांची बदनामी करणारे पुस्तक राज्यसभेमध्ये फाडण्याचे धैर्य गवई साहेबांनी दाखविले.

सभापती महोदय, एकसंघ भारत व शोषण मुक्त समाजाची निर्मिती करणे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न होते. या स्वप्नांना वास्तवामध्ये उतरविण्यासाठी गवई साहेबांनी आपल्या आयुष्यामध्ये अनेक महत्वाची कार्ये केली हे मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी भंडारा जिल्ह्यामध्ये एका महिलेला नग्न करुन तिची विटंबना करण्यात आली, तिच्यावर अत्याचार करण्यात आले, असा एक प्रसंग सांगितला, त्यावेळी गवई साहेबांनी केलेल्या कामाचा उल्लेख केला. ज्या अमरावती विभागामध्ये गवई साहेब राहतात तेथे सांगळूर नावाचे गाव आहे. त्या गावातील एकअस्पृश्य, दलित बौद्ध महिला सार्वजनिक विहिरी पाणी भरण्यासाठी गेली म्हणून त्या महिलेला विवस्त्र करुन प्रचंड मारहाण करण्यात आली, नको त्या ठिकाणी चटके देण्यात आले, गावभर फिरवण्यात आले. या घटनेमुळे संपूर्ण विदर्भ आणि महाराष्ट्र पेटला. श्री.गवई साहेबांनी आरोपींना शिक्षा करण्याचे काम केलेच. पण त्या महिलेला साडीचोळी देऊन तिचे दुःख कमी करण्याचा प्रयत्न करुन सामाजिक शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी गवई साहेब म्हणाले की, अशा पद्धतीने माणुसकीला काळिमा फासणारे प्रकार शिवाजी महाराजांच्या, शाहू-फुले-आंबेडकराच्या राज्यात होत



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

असतील तर ती राज्याला अतिशय लांच्छनास्पद गोष्ट आहे. भविष्यात अशाप्रकारचे कलंक लागता कामा नयेत याची दक्षता समाजाने, बहुजन समाजाने, सवर्ण समाजाने, सरकारने आणि पोलीस विभागाने घेतली पाहिजे.

सभापती महोदय, गवई साहेबांनी ऐक्यासाठी काय केले ते सांगतो. रिपब्लिकन पॉर्टी ऑफ इंडियाची फाटाफूट झाली होती. आम्ही 1994 मध्ये पुन्हा एकत्र आलो. रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, आमची दलित मुक्ती सेना असे सर्वजण एकत्र आलो. आम्हाला नको असताना राजकारणामध्ये भाग घ्यायला लावला.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

आम्ही दलित मुक्ती सेना बरखास्त करुन रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्यामध्ये सामील झालो. सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांना या बाबतची माहिती आहे. गवई साहेबांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य झाले. त्यावेळी रिपब्लिकन पक्षाने लोकसभेच्या 11 जागा स्वबळावर लढविल्या. त्या निवडणुकीमध्ये रिपब्लिकन पक्षाला इतकी मते मिळाली की, निवडणूक आयोगाकडून रिपब्लिकन पक्षाला मान्यता मिळाली व त्या पक्षाला 'उगवता सूर्य' हे चिन्हे मिळाले. त्यानंतर 1998 च्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने कॉंग्रेस पक्षासोबत निवडणूक लढविली. कॉंग्रेस पक्षाकडून गवई साहेबांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्षाला चार जागा सोडण्यात आल्या. सभापती महोदय, ऐक्यात किती शक्ती आणि ताकद असते हे 1998 च्या निवडणुकीत दिसले. महोदय, त्या निवडणुकीत आमच्यासारखे चारही अनपढ लोक निवडून आले. कारण आम्ही राजकारणात अनपढच होतो. यामागील चमत्कार हा ऐक्याचा होता.

माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते साहेब, आम्ही निवडून आल्यानंतर आम्हाला संसदीय कामकाजाची काहीच माहिती नव्हती. परंतु गवई साईबांनी आमच्यासाठी फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईडचे काम केले. संसदीय काम कसे करावयाचे, संसदीय कामकाजाची पध्दत कशी असते हे आम्ही त्यांच्याकडून शिकलो. महोदय, आपण मध्यंतरी म्हटले होते की, लोकप्रतिनिधी हे संसदीय लोकशाहीला जबाबदार असतात. हीच भूमिका गवई साहेबांनी आमच्यासमोर ठेवली. आमच्यासाठी फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड असलेले गवई साहेब आता आमच्यातून निघून गेले आहेत. त्यांच्या जाण्याने समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. उपेक्षित, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, गरीब, वंचित, अल्पसंख्याक समाजाच्या हक्कासाठी आणि अधिकारासाठी भांडणारा एक महान नेता आमच्यातून निघून गेला ही अत्यंत शोकांतिका आहे. माननीय मुख्यमंत्री आणि इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी या दोन्ही नेत्यांच्या दु:खद निधनाबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या सभागृहाला गवई साहेबांनी 1964 ते1994 पर्यंत जे योगदान दिले ते योगदान हे सभागृह विसरु शकत नाही, हे आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, श्री.रा.सु.गवई साहेबांचे निधन झाल्यानंतर मी अमरावतीला गेलो. त्या ठिकाणी 50-60 हजार लोक आले होते. ते सर्वजण 'गवई साहब अमर रहें, गवई साहब-नीला



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

सलाम' अशा घोषणा देत होते. आजच्या प्रसंगी 'गवई साहब अमर रहें' डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम साहब अमर रहे' एवढेच सांगतो आणि या दोघांनाही नीला सलाम करुन त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, भारताचे माजी राष्ट्रपती आणि श्री.रा.सु.गवई, माजी सभापती यांच्या निधनाबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांनी जो शोक प्रस्ताव मांडला त्याबद्दल पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो व माझे भाषण संपवितो.

धन्यवाद.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जनार्दन चांदूरकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आणि महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सभापती तसेच बिहार आणि केरळ राज्याचे माजी राज्यपाल यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देऊन, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आणि रा.सु. गवई यांच्या विषयी माहिती दिली. त्यांनी आपल्या भाषणात या दोन्हीही महान व्यक्तींच्या गुणांबाबत सांगितले. या शोक प्रस्तावावर बोलताना मी लांबलचक भाषण करणार नाही. परंतु या दोन्ही व्यक्तींना श्रध्दांजली वाहत असताना काही गोष्टींकडे मी लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, शेक्सपियरच्या एका नाटकात असे म्हटले आहे की, "Some people are born great, some people achieve greatness, and greatness is thrust upon some." म्हणजेच काही लोक जन्मानेच मोठे असतात. उदाहरणार्थ राजाचा मुलगा हा राजा होतो. काही लोक मात्र कर्तृत्वाने मोठे होतात आणि काही लोकांच्या बाबतीत ग्रेटनेस थ्रस्ट केला जातो. म्हणजेच त्यांची योग्यता नसताना सुध्दा त्यांना मोठे केले जाते. "Greatness is thrust upon them." मी सांगू इच्छितो डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आणि श्री.रा.सु.गवई यांच्यासारखे लोक जन्माने किंवा त्यांच्यावर कोणी मेहरबानी केली म्हणून मोठे झाले नाहीत तर, ते स्वत:च्या कर्तृत्वाने मोठे झाले. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्याबद्दल असे सांगू इच्छितो की, या देशातील शास्त्रज्ञांच्या इतिहासामध्ये सी.व्ही.रमन यांच्यानंतर 'मॅन ऑफ मिसाईल' म्हणून देशातील सर्वात मोठा शास्त्रज्ञ या नात्याने डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे नाव अजरामर राहणार आहे. सिसरो नावाच्या तत्त्ववेत्त्याने सांगितले आहे की, "Life of the dead is placed in the memory of living." मृत लोकांचे जीवन हे जिवंत लोकांना मार्गदर्शन करणारे असते. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आणि श्री.रा.सु.गवई यांचे जीवन हे या देशाला मार्गदर्शन करणारे आहे.

सभापती महोदय, कै.रा.सु.गवई यांनी महाराष्ट्राची सेवा केली. देशाच्या घटनेचे इंटरप्रीटेशन केले. ते एक मुत्सद्दी आणि कुशल संघटक होते. त्यांनी शाहू, फुले, आंबेडकरांच्या चळवळीतून प्रेरणा घेऊन, महाराष्ट्रात सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे काम केले. या बाबतचा

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जनार्दन चांदूरकर....

उल्लेख माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात केला. या दोन नेत्यांच्या बाबतीत बोलताना सांगू इच्छितो की, टेनीसन नावाचे कवी त्यांच्या कवितेमध्ये असे म्हणतात की, "Men may come and men may go." म्हणजे लोक येतील आणि लोक जातील. पण "Dr. A.P.J.Abdul Kalam and Shri R.S.Gawai will go on forever." एवढेच या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, मी कै.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आणि कै.रा.सु.गवई यांच्या दुःखद निधनाबद्दल त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, भारताचे माजी राष्ट्रपती आणि कै.रामकृष्ण सूर्यभान गवई, माजी सभापती, विधानपरिषद व माजी राज्यपाल यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे. या शोक प्रस्तावावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय गट नेते आणि सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

या सभागृहात आणि विधानसभेत गेल्या 20-25 वर्षांत बऱ्याचशा शोक प्रस्तावांवरील भाषणे मी ऐकली आहेत, किंबहुना मी त्याचा साक्षीदार आहे. परंतु आजच्या शोक प्रस्तावाच्या अनुषंगाने मला एक फरक जाणवतो की, आज ज्या भावना व्यक्त झालेल्या आहेत त्यातून दोन महनीय व्यक्तींच्या दु:खद निधनाबद्दल श्रध्दांजली व्यक्त केली गेली. ती श्रध्दांजली सन्माननीय सदस्यांना आलेल्या अनुभवातून व्यक्त केली गेली. तसेच पक्षातर्फे सुध्दा श्रध्दांजली व्यक्त केली गेली. सर्वच मान्यवरांनी या दोन्ही व्यक्तींविषयी बोलताना त्यांच्या चरित्राचे टप्पे सांगितले गेले. तसेच त्यांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात मिळालेल्या यशाचे वर्णन केले. या दोन्ही व्यक्तींनी मांडलेले विचार हे मार्गदर्शक कसे ठरतील या विषयी सुध्दा बोलले गेले. मला हा फरक जाणवतो की, शोक प्रस्तावावरील विचार हे औपचारिकता म्हणून मांडले जातात. आजचे विचार हे हृदयातून मांडण्यात आलेले विचार आहेत, अशी माझी स्वत:ची भावना झालेली आहे. या दोन्ही महनीय व्यक्तिमत्त्वांबद्दल मला स्वत:ला जे अनुभव आलेले आहेत तेवढ्यापुरतेच मी बोलणार आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती ....**

मला माझ्या आयुष्यात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्याबरोबर तिनदा कार्यक्रमात सामील होण्याचे भाग्य मिळाले. पुण्यात जीआयएसटी नावाची त्यांनीच काढलेली एक संस्था आहे. सन 2010 मध्ये या संस्थेच्या आणि एमएस सोसायटीच्या माध्यमातून 'पाणी' या विषयावर त्यांचे व्याख्यान होते. दोन दिवसांची कॉन्फरन्स होती. मलाही तत्कालीन जलसंपदा मंत्री म्हणून बोलाविण्यात आले होते. मी तेथे हजर होतो. त्यांचे स्वागत केले, त्यांच्याबरोबर गेलो. समोर बसलेले 4, 5, 6 हजार मुले डॉ. कलाम साहेब स्टेजवर आले तेव्हा उत्स्फुर्तपणे उठून उभे राहिले, त्यांनी त्यांचे स्वागत टाळ्यांनी केले, त्यांच्या चेहऱ्यावरील असलेल्या हास्यांनी केले, कार्यक्रम सुरू झाला. कार्यक्रमाचा विषय 'पाणी' होता. पाणी कसे वाचवावे, पाणी कसे न्यावे त्यासंबंधी काय करावे यासंबंधी तसेच पाण्याच्या जलसंपदेबद्दल बोलले गेले. माझ्यावर बोलण्याची वेळ आली, तेव्हा मी पाण्यावर तर बोललोच आणि समोर बसलेल्या तरूण पिढीबाबत मला बोलणे स्वाभाविक होते. त्यामुळे मी म्हटले की, तरूण पिढीने राजकीय क्षेत्रात सामील झाले पाहिजे. मी अशा प्रकारचे विचार व्यक्त केले. डॉ. कलाम साहेब नेहमीच्या पध्दतीप्रमाणे डायसवर जातात तेव्हा त्यांचा कॉम्प्युटर त्यांच्यासोबत असायचा अशी माझी समजूत आहे. डॉ. कलाम साहेब मंचावर गेले, कॉम्प्युटर जोडला गेला, बोलायला सुरूवात केली, शांतता प्रस्थापित होतीच, मुलांच्या अपेक्षा त्यांच्याकडून होत्या, मुलांच्या नजरा त्यांच्यावर रोखल्या गेल्या होत्या. त्यांनी त्यांच्या नेहमीच्या पध्दतीप्रमाणे मुलांना विचारले की, कोणाला डॉक्टर व्हायचे आहे, कोणाला इंजिनिअर व्हायचे आहे, कोणाला शास्त्रज्ञ व्हायचे आहे ? त्यांनी भावना व्यक्त केल्या, प्रश्न विचारले. राजकारणात कोणाला जायचे आहे हाही प्रश्न डॉ. कलाम साहेबांनी विचारला. माझ्या सहकारी सन्माननीय सदस्यांनी लक्षात ठेवण्यासारखी एक घटना आहे की, एकही हात वर गेला नाही. उलट विद्यार्थी आणि प्रेक्षक माझ्याकडे नजर वळवून हसायला लागले अशी परिस्थिती त्यावेळी निर्माण झाली. ॲन्टी क्लायमॅक्स म्हणतात तो त्यापुढील आहे. डॉ. कलाम साहेब म्हणाले की, मी श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांनी जे विचार व्यक्त केले त्याच्याशी सहमत आहे. तरूण पिढीने राजकारणात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती ....**

यायलाच पाहिजे या मताचा मी आहे. त्यावर परत टाळ्या पडल्या. माझ्या विचारांना त्यांनी जी सहमती दाखविली त्यावरून माझ्या राजकीय आयुष्यात, पुढील सार्वजनिक आयुष्यात मला अजून कोणते प्रशस्तिपत्रक मिळविण्याचे बाकी आहे असे मला स्वतःला वाटत नाही.

दुसरा प्रसंग रयत शिक्षण संस्थेच्या संदर्भातील आहे. मी रयत शिक्षण संस्थेचा एक भाग आहे, सदस्य आहे. रयत शिक्षण संस्थेने त्यांना मुलांच्या समोर बोलाविले हाते. त्याही वेळी हीच अनुभूती आली, अनुभव आला. रयत शिक्षण संस्थेची मुले सर्वसामान्य घरातून आलेली असतात, आर्थिकदृष्ट्या प्रबळ घरातून आलेली नसतात. डॉ. कलाम साहेब तेथे आले तेव्हा या मुलांच्या चेहऱ्यावरच्या भावना लक्षात आल्या. माझ्या मनात एक गोष्ट येत आहे की, आपल्यातून हे जरी गेलेले असतील तरी तसे नाही. आपल्याला सूर्य कायम ऊर्जा देतो. आपले विश्व, पृथ्वी सूर्याच्या ऊर्जेतून जगत असते, पुढे जात असते. मला ही ऊर्जा प्रत्यक्ष डॉ. कलाम साहेबांच्या माध्यमातून दिसली. मला जाणीवपूर्वक उल्लेख करावासा वाटतो की, त्यांच्याबरोबर शेवटचा कार्यक्रम त्याच दिवशी झाला. मी आमच्या सातारा जिल्हा बँकेच्या काही कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांना बोलाविले होते. आमच्या बँकेचे संगणकीकरण झाले त्यावेळी त्यांनी येण्याचे मान्य केले होते. कै. यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याचे अनावरण करताना ते त्याच कार्यक्रमात उपस्थित होते. त्यांनी तीनही कार्यक्रमात जलसंपदेच्या संदर्भात, मुलांच्या भविष्याच्या संदर्भात आणि बँकेच्या संदर्भात विचार मांडले. मी सर्व प्रसंगांचा साक्षीदार होऊ शकलो, या स्मरणीय घटना कायम माझ्या स्वतःच्या ध्यानात राहतील. पैगंबरवासी डॉ. कलाम आपल्यातून निघून गेले आहेत हेच मी मानायला तयार नाही. आपल्यातून निश्चित त्यांचे पार्थिव गेलेले असेल. परंतु सर्वसामान्य तरुण मुलांच्या, बालकांच्या मनात त्यांनी आशेचा किरण ठेवला आहे, ऊर्जा ठेवली आहे. आपल्याला निश्चितपणे जगात, देशात त्यांच्या अस्तित्वाची ज्योत जाणवणार आहे. हे दुर्दैव आहे आणि मी कदाचित त्यांच्या आयुष्यातील दुर्दैव मानेन की, सन 2020 हे त्यांनी त्यांच्या उद्दिष्टाचे वर्ष ठरविले हाते. परंतु 5 वर्षांच्या अगोदरच त्यांचे पार्थिव आपल्यातून गेले आहे. मात्र ते पार्थिव विचार मागे सोडून गेले आहे. तरुण वर्गाला, पिढीला सर्वार्थाने दिलेली ही ऊर्जा कायमस्वरूपी राहील. मुलांच्यात ही ऊर्जा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती ....**

कायम रहावी. काही सन्माननीय सदस्यांनी सूचना केली की, त्यांचा जन्मदिन "विज्ञान दिन" म्हणून साजरा करावा. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी त्यामध्ये सुधारणा केली की, "विज्ञान दिन" केंद्र सरकार करते. केंद्र सरकारने "विज्ञान दिन" केला असेल तर महाराष्ट्र राज्याने त्यांच्या स्मरणार्थ "बाल विज्ञान दिन" म्हणून साजरा करावा अशी मी सूचना करतो.

श्री. रा.सू.गवई गेले. दुर्दैवाने माझा त्यांच्याशी जास्त संपर्क आला नाही. परंतु मी त्यांचे नाव निश्चितपणे ऐकून होतो. दलित समाजातून पुढे आलेले व्यक्तिमत्व अशा भावना व्यक्त झाल्या. आम्ही दादासाहेबांचे नाव ऐकून होतो. माझ्या लक्षात एक गोष्ट आहे. मी त्यांच्याबरोबर बसलो होतो, योग आला होता. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे सरांनी त्यांच्या पानाच्या डब्ब्याचा उल्लेख केला. सन 1999 ची गोष्ट आहे. आम्ही पुण्याला सर्वजण एकत्र बसलो होतो. दादासाहेबांची आणि माननीय श्री. शरद पवार साहेबांची बोलणी चालू होती. मी बघत होतो की, ते व्यक्तिमत्व पवार साहेबांच्या बरोबर आरामात बसून पान खात होते, त्यांचा अडकित्ता व सुपारी बरोबर होती. मी त्यांचा वैदर्भीय गुण बघितलेला होता. (अडथळा) वऱ्हाडाचा उल्लेख वेगळा करणे उचित होणार नाही. जे काही होते ते दादासाहेबांचे होते. दादासाहेबांचे गुण विशेषकरून त्यांनी सभागृहाला दिलेले योगदान निश्चितपणे आपल्या सर्वांना मार्गदर्शक ठरेल. मी जास्त काही बोलून आपला वेळ घेऊ इच्छित नाही.

दोन्ही महामानवांना वैयक्तिकरित्या माझ्यातर्फे, आपल्या सर्वांतर्फे श्रध्दांजली वाहून त्यांचे विचार आपल्या हृदयात, तरुण पिढीच्या हृदयात कायमस्वरूपी तेवत रहावेत एवढीच प्रार्थना करतो.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी मी विनंती करतो.

(सन्माननीय सदस्य उभे राहतात.)

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 29 जुलै, 2015 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची बैठक पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 29 मिनिटांनी बुधवार, दिनांक 29 जुलै, 2015 च्या सकाळी 10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION